// SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

**Price Rs. 3/-**

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) पुणे

।। स्वयमेव मृगेंद्रता ।।

# संवाद

*मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।*
*सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।*

**Vol.-3** **Issue - 5** नोव्हेंबर - २०१० **November 2010**

## संपादकीय

प्रिय सभासद मित्रांनो,

नोव्हेंबरच्या पहिल्याच आठवड्यातच दिवाळी आली, थांबली आणि गेलीसुद्धा. शिवाय यंदा दोनच दिवसात दिवाळीने आपला मुक्काम हालविला. (कदाचित वाढती महागाई, शिवाय खव्यातली भेसळ यात आपली भर नको म्हणून.) पुन: आपले नित्य जीवन म्हणजे तेच हसणे आणि तेच रडगाणेही चालू राहील. हाच तर जीवनप्रवाह. मध्यंतरी वर्तमानपत्रात 'आदर्श' प्रकरण गाजत राहिले. परिणामी आपल्या महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीही बदलले गेले. राजकारण हा 'संवाद'चा विषय नाही हे खरे. पण राज्यकर्त्यांच्या बऱ्यावाईट कृत्यांचे पडसाद जनमानसावर उमटल्याविना कसे राहतील? नव्या मुख्यमंत्र्यांनी केंद्रियमंत्री असताना आपले पेन्शनविषयक गाऱ्हाणे दिल्लीतील खासदार आणि संबंधित केंद्रिय अर्थमंत्र्यापर्यंत पोचविल्याचे आपणास आठवत असेल.

अयोध्या प्रकरणीचा उच्च न्यायालयाचा निर्णय लागला तेव्हा वातावरण किती तंग होते! सुदैवाने कोठेही अवांछनीय घटना घडली नाही. पण आता सर्वोच्च न्यायालयात ते प्रकरण गेले आहे. श्रीरामाला 'मर्यादा पुरुषोत्तम' म्हणतात. तो भाग वेगळा. पण आपल्याकडे मात्र वादावादीला तरी मर्यादा नाही. असो. 'दिवाळी अंक' हे आपल्या मराठी भाषेचे खास वैशिष्ट्य. हे दिवाळी अंक तर वर्षभर पुरवून पुरवून वाचायचे असतात. आपल्या 'संवाद'च्या दिवाळी अंकाला मात्र पृष्ठसंख्येच्या मर्यादा सांभाळाव्या लागतात. म्हणून इच्छा असूनही आम्ही अधिक काही देवू शकलो नाही हे खरे. बऱ्याच वाचकांच्या प्रतिक्रिया लेखी नव्हे पण तोंडी कानावर आल्या म्हणून हा खुलासा.

नोव्हेंबर २०१० मध्ये दोन शताब्दी आहेत. लो.टिळकांनी मंडालेच्या कारागृहात **'गीतारहस्य'** या ग्रंथाच्या लेखनास सुरुवात केली. ती २ नोव्हेंबर १९१० आणि तो ग्रंथ अर्पण केला तो 'श्रीशाय जनतात्मने'. निष्काम कर्मयोग हीच गीतेची शिकवण असे ठामपणे सांगणाऱ्या लोकमान्यांनी 'मा ते संग: अस्तु अकर्मणि' हा गीतेचा संदेश आहे हे सांगितले आहे. आपण सेवानिवृत्त झालो असलो तरी निष्क्रिय मात्र राहता कामा नये हाच आपल्यासाठी गीतेचा अंतिम संदेश आहे.

**कविवर्य बाळकृष्ण भगवंत बोरकर** तथा बाकीबाब यांची जन्मशताब्दी याच महिन्यात म्हणजे दि. ३० नोव्हेंबरला आहे. गोव्यात कुडचडे येथे जन्मलेला हा कवी 'गाणं आणि चांदणं यांच्या प्रेमात पडलेला एक धुंद कवी' (इति प्रा. व. दि. कुलकर्णी). बोरकरांच्या कविता त्यांच्याच तोंडून ऐकण्याचे भाग्य लाभलेले आपले अनेक गोवेकर रसिक सभासदमित्र आहेत. पु.लं.नी घेतलेली बा.भं.ची मुलाखत उपलब्ध आहे. मराठीचे (आणि कोकणीचे) नादमाधुर्य समजून घ्यायला ज्ञानेश्वर, भा. रा. तांबे यांच्याबरोबर बाकीबाबसुद्धा वाचलाच पाहिजे आणि जमला तर ऐकलाच पाहिजे.

'प्राणातून उसळते आनंदाचे गान,
गानातून घडे येथे अमृताचे स्नान
त्याचे बीजगूज मला भोगायचे आहे,
मरायचे नाही मला जगायचे आहे ।' - बोरकर

शरीर त्यागानंतरही जीवंत राहणे घडते ते अशा प्रकारच्या ग्रंथनिर्मितीमुळे, काव्यनिर्मितीमुळेच. लोकमान्य आणि रसिकमान्य अशा या मराठीच्या दोन्ही सुपुत्रांना अभिवादन!

**- श्रीधर विश्वनाथ सहस्रबुद्धे,**

भ्रमणध्वनी: ९८२३२८५३९०

**✻ असोसिएशनच्या लीगल फंडाला सढळ हाताने देणगी द्या! ✻**

## युनिट वार्ता- अहमदनगर :

अहमदनगर युनिटच्या वतीने कोजागिरी पौर्णिमा उत्सव २१ आक्टोबर २०१० रोजी संपन्न झाला. श्री.थडाणी यांचे रविकिरण सोसायटीमधील बंगल्याचे प्रशस्त गच्चीवर रात्री ८ वाजता आयोजित केलेल्या या कार्यक्रमास ९० सभासद उपस्थित होते. यानिमित्त बँकेतील अधिकारी श्री.अनिल कोठारी व श्रीमती सुजाता दुर्के यांच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सचिव श्री.एस.आर.जोशी यांनी प्रास्ताविक केले व असोसिएशनच्या पुणे येथील दि.२० ऑक्टोबर २०१० च्या पुणे झोनल सब-सेंटरच्या कार्यकारिणीच्या बैठकीचा वृत्तांत कथन केला. त्यानंतर श्री.सुरेश चीतांबर यांनी गायकवृंदाचा परिचय करून दिला. ओंकर स्वरूपाने गायनाचा आरंभ करीत त्यांनी मराठी भावगीते, तसेच जुनी हिंदी गाणी गावून मैफिलीत रंगत आणली. त्याला उपस्थित रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली. मध्यंतरात श्री.जी.व्ही.मुळे, श्री. व सौ.मोकाशी, श्रीमती माधवी कुलकर्णी, सौ.टेंभुर्णीकर, श्री.धर्माधिकारी, श्री.आर.पी.कुलकर्णी या सभासदांनी आपल्या विनोद-कथन व कविता गायनाने कार्यक्रमात रंगत आणली. श्री.गोहाड व श्री.शिंदे यांनी तबल्यावर साथ दिली. ज्येष्ठ सभासद श्री.एस.एल.काळे यांनी सर्व कलाकारांचे कौतुक केले. लज्जतदार भेळ व मसालेदार दुधाचा स्वाद घेत कार्यक्रमाची सांगता झाली. अध्यक्ष श्री.घोटणाकर व खजिनदार श्री.मोकाशी यांच्या हस्ते गायकवृंदाचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन श्री.एस.आर.जोशी, सचिव, यांनी केले. तसेच कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यात रविकिरण सोसायटीचे सभासद आणि श्री.संजय वाकडे व श्री.संतोष गोरे यांनी विशेष सहकार्य केले.

- शिवप्रसाद रा.जोशी, सचिव

## खामगाव युनिट :

खामगाव युनिटची सर्वसाधारण सभा दि.४ सप्टेंबर २०१० रोजी खामगाव शाखेत संपन्न झाली. नागपूर झोनल सब-सेंटरचे उपाध्यक्ष व खामगाव युनिटचे सेक्रेटरी श्री.एम.जी.मुणोत यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. नंतर श्री.के.एल.सावळे यांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली म्हणून, तसेच त्यांचे लग्नाला ५० वर्षे पूर्ण झाले त्या प्रित्यर्थ श्री. व सौ.सावळे या उभयतांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन व सौ.सावळे यांना साडी श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. त्यावेळी श्री.सावळे यांनी आभार प्रदर्शित करून असोसिएशनला रु.४००/- ची देणगी दिली. त्यानंतर श्री.मुणोत यांनी नागपूर विभागाचे कार्याची माहिती व फेडरेशन स्तरावर पेन्शन वाढीसाठी चालू असलेल्या प्रयत्नांची व कोर्टकेसेस संबंधी सविस्तर माहिती सांगितली. त्याचबरोबर, बँकेने मेडिकल बेनिफिट स्कीम मध्ये रु. ७ लाखापर्यंत वाढ केल्यामुळे व त्याच्या १0% डोमिसिलिअरी ट्रीटमेंटच्या सर्व आजारांसाठीचा खर्च देणारी सुधारीत स्कीम लागू केल्यामुळे सर्व अेलिजिबल सभासदांनी त्वरित सभासद व्हावे असे आवाहन केले. त्यानंतर सभासदांच्या शंका निरसनाचा कार्यक्रम झाला. श्री.दुबे यांनी आभार प्रदर्शन केल्यावर सभेची सांगता झाली. सभेला ३५ सभासद हजर होते.

- एम.जी.मुणोत, सेक्रेटरी (खामगाव)

## डोंबिवली युनिट

डोंबिवली ते बदलापूर-भिवंडी या विभागातील सर्व पेन्शनर्स व फॅमिली पेन्शनर्सची एक सभा (पेन्शनर्स मीट) बँकेने आयोजित केली आहे. ही सभा **शुकवार दि. ३ डिसेंबर २०१० रोजी दुपारी ४।। वाजता डोंबिवली (ईस्ट) ब्रँच मध्ये** आयोजित केली आहे. सभेला मुंबई झोनल सब-सेंटरचे अध्यक्ष श्री.एस.बी.गोखले तसेच उपाध्यक्ष श्री.धराधर व सेक्रेटरी श्री.राजिवडेकर हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. तरी डोंबिवली ते बदलापूर व भिवंडी या भागात रहाणाऱ्या सर्व पेन्शनर्स व फॅमिली पेन्शनर्सनी या सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

- सुभाष आगरकर, कार्यवाह (डोंबिवली विभाग)

## विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी - पुणे शाखा

'निष्ठा', २१ सदाशिव पेठ, पूना हॉस्पिटल समोर, पुणे-३०

फोन नं. ०२०-२४३२५५५३

**कन्याकुमारी येथे आध्यात्मिक शिबिर-फेब्रुवारी २०११**

दि.८ फेब्रु. ते १४ फेब्रु.२०११ या काळात वरील शिबिर आयोजित केले आहे. दि.७ फेब्रुवारी २०११ ला सायंकाळी ५ वाजे पर्यंत विवेकानंदपुरम, कन्याकुमारी येथे पोहाचणे अपेक्षित. त्यासाठी दि.५ फेब्रुवारी २०११ चे रेल्वे आरक्षण करावे लागेल. वयोगट : ४० वर्षांपुढील. शिबिर देणगी-शुल्क रु.१५००/- (निवास व भोजनासहित). + रु.१००/- 'विवेक विचार' मसिकाची वार्षिक वर्गणी. एक वेळच्या द्वितीय श्रेणी - शयनयानाचा प्रवास खर्च अंदाजे रु.५००/-. (ज्येष्ठ नागरिकांना यात नियमानुसार सवलत मिळू शकते). शिबिराचे इंग्रजी माध्यम व हिंदी माध्यम असे दोन गट असतील.

**संपर्क : श्री.चिं.वि.असनीकर, (मो)९४२३५८०३८४.**

## बसने नर्मदा परिक्रमा

**चला ३X२ लक्झरी बसने नर्मदा परिक्रमा करण्यासाठी.**

**बस भाडे व रहाण्या-जेवण्याच्या सर्व खर्चासहित**

**एकूण १८ दिवसांसाठी खर्च रु.९,०००/- फक्त.**

**चार बॅचेस : दि.२२ डिसेंबर २०१०; दि.१८ जानेवारी २०११; दि.८ फेब्रुवारी २०११ व दि.८ मार्च २०११**

***संपर्क : डोंगरे, वधू-वर सूचक***

***(मो.) ९४२२३१९२१८; फोन : ०२०/२४४७८५४९***

## आपली असोसिएशन - बिनकामाची संस्था कशी?

दि.२६ मे २०१० च्या दै. लोकसत्ताच्या 'लोकमानस' या सदरात श्री.पी.जी.तडवळकर यांचे आपल्या असोसिएशनच्या संदर्भात एक पत्र प्रथम प्रसिद्ध झाले होते. त्यावर प्रतिक्रिया म्हणून आपल्या कांहीं सभासदांनी तडवळकरांची असत्य व भंपक विधाने खोडून काढली होती. पुन्हा दि.६ ऑक्टोबर २०१० रोजी तडवळकरांनी दुसरे पत्र दै.लोकसत्तामध्ये प्रसिद्धीस दिले व ते छापून आले. त्यात त्यांनी असोसिएशनबद्दल पुन्हा असत्य विधाने केली होती. श्री.तडवळकर हे आपल्या असोसिएशनचे सभासद होते. पण त्यांनी स्वत:हून आपले सभासदत्व १५ जानेवारी २०१० ला ई-मेल द्वारे पत्रव्यवहार करून वैयक्तिक कारणासाठी कमी करण्यास सांगितले व भरलेली (स्वत:ची व पत्नीची) सभासद फी व देणगी रक्कम रु.१४,९४०/- परत मागितली. त्यांच्या इच्छेप्रमाणे ही देणगी रक्कम फक्त त्यांना चेकने परत केली व त्यांच्याच इच्छेनुसार सभासदत्व रद्द केले. या संदर्भात असोसिएशनने तडवळकरांच्या असत्य विधानांचा समाचार घेणारे एक पत्र ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यातच दै. लोकसत्ताकडे प्रसिद्धीसाठी पाठवले आहे. ते आपल्या सभासदांच्या माहितीसाठी 'संवाद' मध्ये खाली देत आहोत.

*****

स्टेट बँक इंडिया पेन्शनर्स असोसिएशन या संस्थेची स्थापना १९७४ साली पुणे येथे झाली. त्यावेळी त्यांची सभासद संख्या फक्त २१ होती. आज ३६ वर्षानंतर सर्व सभासदसंख्या अंदाजे १६,७०० आहे. त्यापैकी १०,००० सभासद आहेत व ६,७०० सहयोगी सभासद आहेत. संस्थेचे मुख्य कार्यालय पुणे येथे असून त्यांची ठाणे, नागपूर, औरंगाबाद, पुणे व पणजी येथे विभागीय कार्यालये आहेत व बहुतेक जिल्हास्तरावर सबंध महाराष्ट्र व गोवा येथे शाखा आहेत.

कोणीही स्टेट बँकेचा निवृत्त कर्मचारी व सहयोगी सभासद होताना त्यांच्याकडून प्रत्येकी फक्त रू. १०१० वर्गणी म्हणून एकदाच घेतले जातात. (one time contribution) आणि नंतर असोसिएशनचा कारभार या पैशांचे येणारे व्याज व देणग्या वगैरे यांच्यावर भागविला जातो. महाराष्ट्रामध्ये जशी असोसिएशन आहे तशाच असोसिएशन्स भारतातील चौदा राज्यात आहेत व त्यांचे सर्वांचे मिळून एक All India Federation केलेले आहे. त्यांचे जवळजवळ १,००,००० सभासद आहेत (म्हणजे चौदा असोसिएशन्सचे).

असोसिएशन व फेडरेशन यांनी फेब्रुवारी १९८१ पासून आजपर्यंत कोर्ट केसेस, मॅनेजमेंटजवळ/बँकिंग डिपार्टमेंट, Government of India मंत्रीगण लोकसभा/राज्यसभा सभासद व इतर संबंधित लोकांजवळ चर्चा करून वेळोवेळी सभासदांना बरेच फायदे मिळवून दिले. हायकोर्ट केसेस आपल्या देशात ७/८ वर्षात बोर्डावर येत नाहीत व जर निर्णय सभासदांचे बाजूने मिळाला तर बँक व Government of India हायकोर्टाचे Composite Bench/Supreme Court येथे अपिलात जाऊन निर्णय लांबवतात हे श्री. तडवळकर यांच्यासारख्या हुशार माणसाला माहीत नाही काय? सुप्रीम कोर्टाने फ्रेब्रुवारी १९८९ मध्ये ५०% पेन्शन देण्याचा निर्णय दिला व त्यावेळी स्टेट बँकेने कोर्टाला पुढील पगारवाढ झाल्यावर पेन्शन revise करण्याचे आश्वासन दिले व गेल्या २० वर्षात ५ वेळा salary revision झाले तेव्हा प्रत्येक वेळी केंद्र सरकारला पेन्शन वाढविण्याचे proposals पाठविले; परंतु प्रत्येक वेळी भारत सरकारने त्याला वाटाण्याच्या अक्षता लावल्या परिणाम म्हणून गेल्या २० वर्षात पेन्शनमध्ये योग्य ती वाढ झालेली नाही. ही वस्तुस्थिती आहे ॲक्टिव ट्रेड युनियननी संप करूनसुद्धा सरकारने योग्य वाढ केलेली नाही.

या सगळ्या प्रयत्नांना यश न आल्यामुळे असोसिएशनने/फेडरेशनने आता सुप्रीम कोर्टाचे दार खटखटवण्याचा निर्णय घेतला आहे.

गेली ३५/३६ वर्षे जी संस्था निरलसपणे काम करते व जिच्या मालकीची आज २ कार्यालये (एक पुणे व दुसरे ठाणे येथे) आहेत व अलिकडे पणजी येथे सभासदांच्या सोयीसाठी हॉलिडे-होम घेतले आहे अशा संस्थेच्या कारभाराबद्दल अज्ञानापोटी अगर पूर्वग्रहदूषित व काहीही माहिती न घेता भंपकपणे काहीतरी विधाने आपल्या सारख्या प्रसिद्ध दैनिकात श्री. तडवळकरांनी करावी व आपण ती लोकमानसमध्ये (२६/५/२०१० व ६/१०/२०१० या दिवशी) आमचेकडे काहीही चौकशी न करता छापावीत याचे आम्हाला अतिशय आश्चर्य व दु:ख झाले आहे.

आमच्या माहितीप्रमाणे पत्रलेखक श्री. पुरूषोत्तम तडवळकर यांनी धादांत बेजबाबदार व तद्दन खोटी विधाने केलेली आहेत हे आम्ही आपल्या व आपल्या सूज्ञ वाचकांच्या नजरेस आणू इच्छितो. संस्थेचा कारभार पद्धतशीर चालला असून By Laws प्रमाणे ज्या सभा व कारभार होण्यास पाहिजे त्याप्रमाणे व्यवस्थित चालू आहे. संस्थेच्या सभासदांच्या मुंबई, पुणे नागपूर, पणजी, औरंगाबाद येथे दरवर्षी वार्षिक सभा होतात व त्यामध्ये सभासदांची उपस्थिती लक्षणीय असते. Zonal Committee केंद्रीय कमिटीचा अहवाल व इतर विषयावर पद्धतशीर विचारविनिमय होतो. मुंबई व पुणे येथील वार्षिक सभेमध्ये १००० चे वर सभासद हजर राहतात व सभेमध्ये हिरीरीने भाग घेतात. याच सभेमध्ये पदाधिकाऱ्यांच्या निवडणूका लोकशाही पद्धतीने होतात. आम्हाला असे वाटते की, तडवळकर अशा सभांना यायला लाजत असावेत अगर ते

आपले डोळे व कान बंद करून बसत असावेत त्यामुळे अशा सभा हल्ली होत नाहीत असे त्यांचे मत असावे व पण ते धादांत खोटे आहे. अलीकडेच दिनांक १२ जुलै २०१० ला पुणे येथे AGM झाली तेव्हा सुमारे १२०० सभासद हजर होते. विशेष सांगण्याची गोष्ट म्हणजे संस्थेचे ३१-३-२०१० चे हिशेब सभासदांनी या सभेत पास केले. आम्हाला वाटते की, आमचे Accounts जुलैच्या सभेमध्ये ठेवून जुलैमध्ये पास करणाऱ्या आमच्यासारख्या कमी संस्था आजकाल आपल्या पाहण्यात येतात. अगदी कंपनी कायद्याने सुद्धा ६ महिन्यांचा वेळ दिला जातो.

गेल्या ३६ वर्षात असोसिएशनने सभासदांसाठी इतके काम केलेले आहे की, त्याची यादी फार मोठी होईल. उदाहरणादाखल Retired Employees Medical Benefit Scheme जी केवळ असोसिएशनचे प्रयत्नाने रू. २ लाखांनी १९९६ साली चालू झाली ती आता रू. २० लाखांपर्यंत नेली व जास्त रोगांवर इलाज करण्याची सुविधा आता मिळाली आहे.

आमच्या माहितीप्रमाणे श्री. तडवळकर यांना अशा संस्थेमध्ये व तसे म्हटले तर कुठल्याच सार्वजनिक सेवाभावी संस्थेमध्ये काम करण्याचा अनुभव नसावा, त्यामुळे संस्थांची कामे करताना काय काय अडचणी येतात व संस्थेचे स्वरूप पाहून आपल्याला  कुठेतरी थांबावे लागते हे माहीत नसावे. ज्या संस्थेचे १६००० सभासद आहेत, त्या संस्थेच्या प्रत्येक सभासदाचे विचार व योजना या असोसिएशनला राबवता येणे शक्य नसते व श्री. तडवळकरांसारखे एकांडे शिलेदार की ज्यांना सद्यस्थितीचा विचार करायला कोणी शिकविलेले दिसत नाही व कुठली सूचना बँक मॅनेजमेंट/भारत सरकार अगर न्यायसंस्था स्वीकारत असेल याची कल्पनाच दिसत नाही; कारण आमची संस्था ही ज्येष्ठ नागरिकांची व powerless असल्यामुळे जरी आपली suggestion चांगली असली तरी आपल्याजवळ Muscle power नसल्यामुळे बलाढ्य भारत सरकारच्या गळी उतरविणे किती कठीण आहे हे आपल्याला मान्य करावेच लागेल. एकदा ते म्हणतात सभासदांना पेन्शनवाढ वगैरे सुविधा बँकच देते व दुसऱ्या ठिकाणी ते म्हणतात की असोसिएशनने गेल्या २० वर्षात सभासदांसाठी काहीच केलेले नाही. या दोन विधानांनी श्री. तडवळकरांच्या मनात कोणत्याही प्रकारचे सामाजिक कार्य न करता किती गोंधळ झाला आहे हे प्रत्ययास येते. ज्येष्ठ नागरिकांचे खटले १८ महिन्यांत निकाली काढावेत असे सुप्रिम कोर्टाचे म्हणणे आहे पण आमच्या Delhi Circle Association ने २००२ साली दिल्ली हायकोर्टात लावलेली केस अजून कुजत पडली आहे व त्यातील ७ Applicants पैकी ४ Applicants केव्हाच निजधामास गेले. ही वस्तुस्थिती या देशातील आहे हे सर्वांनी लक्षात घ्यावे.

असोसिएशनचे पदाधिकारी हे सर्व ज्येष्ठ नागरिक असल्यामुळे त्यांनी कुठल्या श्रेणीने प्रवास करावा असे श्री. तडवळकरांना वाटते? तरीसुद्धा बरेच वेळा ते Second Class Railway व एसटीच्याच तांबड्या गाडीतूनसुद्धा प्रवास करतात.

वरील सर्व परिस्थितीचा अभ्यास केल्यावर प्रश्न पडतो की श्री. तडवळकरांना आमच्याशी काही एक चौकशी न करता सरळ वर्तमानपत्राकडे धाव का घ्यावी लागली? त्याचे खरे कारण असे असावे की त्यांच्या पोरकटाप्रमाणे एवढ्या मोठ्या संस्थेने वागावे असे त्यांना वाटते. आम्हाला असे कळते की, श्री. तडवळकरांनी संस्थेला रू. १०/११००० ची देणगी दिली होती, परंतु त्यांचे नाव लगेच पुढच्या House Magazine च्या अंकात छापून आले नाही त्यामुळे ते भडकले. आता आपणच विचार करा की संस्थेला अनेक लोकांकडून वेगवेगळ्या रकमेच्या देणग्या मिळत असतात त्यामुळे देणगीदारांची नावे दर ३/६ महिन्यांनी एकदम छापली जातात. संस्थेला आली देणगी छापा नांव असे करता येत नाही काहीतरी शिस्त पाळावीच लागते. पण ते श्री. तडवळकरांसारख्या स्वकेंद्रित (selfcentered) माणसाला मान्य नाही. त्याला आम्ही काही करू शकत नाही कारण संस्थेला काही नियम पाळावेच लागतात. श्री. तडवळकरांची सूचना आम्हाला पाळता येणे शक्य नव्हती म्हणून त्यांची देणगी त्यांनी मागणी करताच आम्ही लगेच परत केली. यावरून त्यांची कोती मनोवृत्ती दिसून येते व संस्थेला काही नियम पाळावे लागतात हे त्यांना मान्य नाही असे दिसते. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये एकदा देणगी दिल्यावर आपले नाव लगेच छापून आले नाही म्हणून रुसणारे हे पहिलेच सभासद आमच्या पहाण्यात आले. खरे म्हणजे आमच्याकडे असे देणगीदार सभासद आहेत की ज्यांनी श्री. तडवळकरांपेक्षा जास्त रकमेच्या देणग्या देऊनही त्यांची नावे छापू नका अशी विनंती केलेली आहे. याचा योग्य अर्थ आपणच काढावा.

श्री. तडवळकर लिहितात की, अवास्तव खर्च करून पदाधिकाऱ्यांनी संस्थेला विपन्नावस्थेस आणले आहे पण ज्या संस्थेच्या नावावर आज जवळजवळ रू. १ कोटीची मालमत्ता व बँक डिपॉझिटस् आहेत त्याला विपन्नावस्था म्हणायचे का हे आम्ही तुमच्यावर व वाचकांवरच सोपवितो.

सभासदांचे संस्थेवर व सध्याच्या पदाधिकाऱ्यांवर इतके प्रेम व विश्वास आहे की, विशेषत: मुंबई व पुण्याच्या AGM मध्ये लाखो रूपयांच्या देणग्या स्वेच्छेने जमा होतात त्यामुळे कदाचित श्री. तडवळकर व त्यांचे पाठीमागचे बोलविते धनी यांचे पोट दुखत असेल व त्याला आमचा नाईलाज आहे. श्री. तडवळकर यांनी Medical Scheme व ग्रूप विम्याबद्दल जे तारे तोडले आहेत त्याबद्दल न बोललेलेच बरे, कारण त्यांना त्या

Schemes च समजलेल्या दिसत नाहीत व सभासदांच्या हिताचा विचार न करता काहीतरी भंपकपणे लिहिण्यापलिकडे आम्ही त्याला महत्त्व देत नाही. (विम्यासाठी दरवर्षी हप्ता भरावा लागतो. आमच्या योजनेत एकदाच रक्कम भरावी लागते.)

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे ज्येष्ठ सभासदांशी व महिलांशी असभ्य वर्तन व त्यांनी केलेला अनावश्यक खर्च याबद्दल आम्हाला काही एक माहिती नाही तरीही श्री. तडवळकरांनी वेगळे पत्र लिहून आम्हाला योग्य माहिती दिल्यास (वृत्तपत्रामध्ये नव्हे) आम्ही त्याची चौकशी करून त्यांना खरी परिस्थिती काय आहे ते कळवू.

खरे म्हणजे श्री. तडवळकरांचे मुद्दे हे कुठल्याही प्रकारच्या योग्य माहितीवर आधारलेले नाहीत व त्यांनी Association ऑफिस जे पुण्यामध्येच आहे तेथून काही माहिती मिळविण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. त्यांनी कुठलीही Annual General Meeting attend केलेली दिसत नाही. सबब त्यांना उत्तर देण्याचा आमचा विचार नव्हता; पण त्यांनी पुन्हा दुगाण्या झाडायला सुरुवात केल्यामुळे व आमचे बरेच सभासद खोटी माहिती व पदाधिकाऱ्यांना दुषणे लावल्यामुळे फार अस्वस्थ झालेले दिसले म्हणून हा पत्राचा प्रपंच.

यापुढे या असल्या कामात वेळेचा अपव्यय करण्याची आमची इच्छा नाही.

## अभिनंदनीय

आपले नागपूर येथील सभासद श्री.श्रीकृष्ण व सौ.अंजली मोरोणे यांचा मुलगा श्री.आनंद मोरोणे व त्याचा सहाध्यायी श्री.समीर कारखानीस यांना "Managing Organizational and Management Challenges in India" या विषयावर नविनतम संकल्पना प्रसृत करण्याच्या उद्देशाने भरवलेल्या सातव्या राष्ट्रीय व्यवस्थापन विद्यार्थी स्पर्धेमध्ये (NCMS) पहिले रनर-अप बक्षीस मिळाले. ही स्पर्धा ऑल इंडिया मॅनेजमेंट असोसिएशनतर्फे नवी दिल्ली येथे दरवर्षी आयोजित करण्यात येते. यात भारताच्या चार विभागातील अग्रगण्य व्यवस्थापनीय 200- B Schools संस्थांनी भाग घेतला होता. त्यातील प्रथम क्रमांकावर असलेल्या भारतीय व्यवस्थापन संस्था, कोलकाता (I.I.M. Kolkata) येथे श्री.आनंद शिक्षण घेत आहे. वरील बक्षीस समारंभ दि.१३ सप्टेंबर २०१० रोजी कोलकाता येथे माननीय राष्ट्राध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील यांचे उपस्थितीत पार पडला. चांदीची ट्रॉफी व रु.१५०००/- रोख (प्रत्येकी) व गोल्डन ट्रॉफी (सामायिक) असे बक्षिसाचे स्वरूप होते. वरील उत्तुंग यशाबद्दल श्री.आनंद व त्याचा सहाध्यायी श्री.समीर यांचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन !

**- सेक्रेटरी**

## कृपया इकडे लक्ष द्या

नोव्हेंबर महिन्यामधे प्रत्येक पेन्शनर व फॅमिली पेन्शनरने, ज्या ब्रँचमधे ते पेन्शन घेतात तिथे समक्ष जाऊन, लाईफ सर्टिफिकेट देणे अपेक्षित आहे. हे आपण केले असेलच. नसल्यास ब्रँचला जाऊन त्वरित लाईफ सर्टिफिकेटवर सही करावी, म्हणजे खात्यावर पेन्शन जमा होत राहील. तसेच ज्या फॅमिली पेन्शनर्सना म्युच्युअल वेल्फेअर स्कीम अंतर्गत दरमहा मंथली-रिलीफ ची रक्कम मिळत असेल अशा फॅमिली पेन्शनर्सनी आणखी एक वेगळे लाईफ सर्टिफिकेट आपल्या पेन्शन-पेइंग ब्रँचमार्फत झोनल ऑफिसला पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा मंथली-रिलीफची रक्कम मिळणे बंद होईल याची कृपया नोंद घ्यावी. या संदर्भात असोसिएशनच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी लक्ष घालावे ही विनंती. जेणेकरून पेन्शनर/फॅमिली पेन्शनर्स सभासदांची पेन्शन अथवा मंथली-रिलीफची रक्कम न मिळाल्यामुळे होणारी गैरसोय टळू शकेल. या बरोबरच, पेन्शनरने लाईफ सर्टिफिकेट दिल्यावर ब्रँचमधील पेन्शनचे काम करणाऱ्या स्टाफने कॉम्प्युटरमधे त्याची नोंद घेतली आहे की नाही याची खात्री करून घ्यावी. कारण गेल्यावर्षी अशी नोंद कॉम्प्युटरमधे वेळेवर न केल्यामुळे अनेक पेन्शनर्सना पेन्शन मिळाले नव्हते. तेव्हा वेळीच काळजी घेऊन त्याची पुनरावृत्ती होऊ देऊ नका.

- सेक्रेटरी

**विनोद**

नोकरीचा राजीनामा देऊन बाळाभाऊ विधानसभा निवडणूकीत उतरले खरे पण निकाल जाहीर होताच त्यांचा भ्रमनिरास झाला. ते दणक्यात पडले मग पुन्हा त्यांनी पूर्वीच्याच कंपनीत नोकरीसाठी अर्ज केला.

मुलाखतीच्या वेळी एका डायरेक्टरने त्यांना विचारले, ''तुम्ही राजकारण सोडून पुन्हा नोकरीकडे वळण्याचं कारण?''

''जनादेश ! बाळाभाऊ सांगत होते - माझ्या मतदार संघातील दोन लाख बेचाळीस हजार... मतदारांपैकी दोन लाख बेचाळीस हजारहून जास्त मतदारांचा तसा मला आदेशच होता.

**- मधु रानडे,** नाशिक

# Karmayogi

We reproduce below a gist from the autobiography of Shri N.P.Thareja. Shri.Thareja is our Pensioner colleague and Vice-President, S.B.I. Pensioners' Association, (Delhi Circle), who on retirement founded the "Human Care Charitable Trust" (HCCT) for service to humanity by helping the poor and downtrodden, widows, sick, disabled and students etc. Shri Thareja is running the trust for the past 14 years and has rendered yeomen service to the Society. Shri Thareja has individually contributed over **Rs.239 lacs to HCCT**, which he has earned by rendering service to people, using his deep knowledge of divine sciences i.e. palmistry, astrology and numerology.

In Delhi High Court a case No CWP-1931 of 2002 has been filed by seven individuals (6 Pensioners and one family Pensioner). Out of seven petitioners by now four Petitioners (3 Pensioners and lone family Pensioner) have died. Only three are alive and Shri Thareja is one of them (Age 85 yrs.) Even at this age he is active and fully busy in social work as stated below. The court case, referred to above, has been supported by our Federation, though **we are not petitioners**. The Petitioners have demanded for re-dressed of all grievances including mainly i) Pension to be calculated on last drawn actual pensionable "Pay" (average) and ii) Family Pension @30% (Flat rate) of "Pay". In this gist we have also stated the efforts made by him for redressal of grievances of Pensioners and Family Pensioners.

B.G. Dandekar
Advisor
Federation of SBI Pensioners' Associations

************************************************************

Name: Shri N.P. Thareja
Date of Birth: December 12, 1925 (85 years),
Mianwali - now in Pakistan

Professional achievements : Joined service in August 1941 at the age of 15 in the Ordinance Depot, Quetta, (Baluchistan). Joined Imperial Bank of India, Quetta on October 18, 1945. Finally retired as Assistant General Manager from State Bank of India on December 31, 1985 at the age of sixty after 40 years of service.

Hobbies / Achievements : Attained knowledge, to the extent possible, on occult sciences of Astrology, Palmistry and Numerology.

Publications :
- Author of a book - 'Palmistry made Easy'
- Author of many articles on astrology, palmistry and numerology and various other topics.
- Political predictions have been published in some leading magazines and newspapers from time to time.
- Brought out compendium of mantras and prayers 'Remedial Measures through Prayers'

Positions held after retirement : - Since August 12, 1996 - Managing Trustee, Human Care Charitable Trust (Regd.)

- Since 2000 - Vice President, State Bank of India Pensioners Association (Delhi Circle)
- Appeared on Jain TV number of times for discussion on the subject of astrology and palmistry.
- Divinatory skills/Few Important Predictions: Shri K.R. Narayanan's joining politics and elevation as Minister, Vice President of India and President of India were predicted as early as March 1984 and from time to time (to Shri Narayanan personally).

- Shri V.P. Singh becoming Prime Minister
- Shri V.P. Singh's fall from power in end of 1990.
- Shri Chandra Shekhar attaining the position of power.
- Shri Rajiv Gandhi's life in danger
- Shri Atal Behari Vajpayee becoming Prime Minister.

- Reference two cover stories of The Illustrated Weekly of India, dated August 21-27, 1988 and December 1-7, 1990;
- Times of India dated December 10, 1989 - an article by an eminent columnist, Mukul Sharma acknowledging prediction about Shri V.P. Singh's coming to power in December 1989.

Awards :

- Conferred the title of Samudrik Vachaspati by Indian Council of Astrological Sciences on 15.05.1994 on the occasion of Second All India Conference on Astrology and Convocation organized by the Council at Pune and, again on 21.11.1999 and 24.07.2004 for promoting the cause of palmistry.
- Recipient of Bharat Nirman's most prestigious "Bhaskar Award" in the field of 'Palmistry' in November 2002 as well as appreciation for selfless social work for the benefit of mankind.
- Honoured by SBI Pensioners' Association for his meritorious social services.
- Awarded Gold shield for dedication and excellent contribution in propagation of Ancient Vedic Sciences by all India Federation of Astrologers' Societies® and, Future Point during exhibition 'Nakshatra 2008'.
- Honoured with Shield in recognition and grateful thanks by 'Opcar Foundation' for kindness and generosity by giving valuable support to them for achieving their goal for integrated human welfare.

Achievements after Retirement : Knowledge of occult sciences proved a boon towards realizing teenage aspirations to do something positive to alleviate the sufferings of the underprivileged and needy.

After retirement Shri Thareja actively engaged himself in social work. Since August 1996, contributions over Rs.239 lakhs have poured in for the services being rendered to people by him, on the basis of Divine Sciences. Instead of using money for his personal use, these have been channelised into the 'Human Care Charitable Trust' (set up on 12-8-1996) to fund its activities, as well as funding other organizations engaged in social work, for providing succour to the helpless, the aged, the needy and the underprivileged.

'Human Care Charitable Trust (Regd.)' was set up on August 12, 1996 and ever since is engaged in carrying out philanthropic work. HCCT functioning at the microscopic level, is attempting to bring succour to as many people as possible through its limited resources. It has been active in the service of humanity and has undertaken a number of projects to do something positive to alleviate the sufferings of the needy, aged and poor.

1985-1996: Generous contributions, running into several lakhs of rupees, have been made during 1985-1996 to some religious organizations, notably the Arya Samaj, Sai Pragya Dham, Saket and Brahmvetta Shree Devraha Hans Baba Trust, Age Care India.

Shri Thareja says:- Most of our colleagues working in branches of the Imperial Bank of India falling in Bengal Circle, which covered entire undivided Punjab and N.W.F.P., were permitted to join branches of their choice in India. But this facility was denied to me as I belonged to Bombay Circle and as and when I approached the New Delhi Agent (Mr. H.E. Towner) I was told to go back to Quetta

as advised to him by Bombay H.O. A very funny situation! There seemed to be no way out. Ultimately I mustered my courage and met the then Prime Minister, Shri Jawahar Lal Nehru. In those good old days people had access to all such high dignitaries whereas at present days we may not be able to go any where, near their shadows. I narrated my problem which was listened to by Shri Nehruji. I along with other aggrieved persons, who happened to be there, enjoyed a cup of tea. I was asked to approach Hon'ble Dy. Prime Minister, Sardar Patel. Accordingly, in a day or two I met Sardar Patel while he was going back to his residence from his morning walk in Lodhi Gardens with his daughter Smt. Mani Behn Patel. As per my memory, the bunglow was No. 1, Aurangzeb road or nearby. I was quite new to Delhi at that time and not very familiar with the area. Sardar Patel said how was it possible for me to go back to Quetta when the Govt. of India was getting people evacuated from those areas to save their lives. The application which I handed over to Sardar Patel gave the desired result and within a few days instructions were received by New Delhi Branch of the Bank from Bombay Local Head office to permit me to join my duties at Imperial Bank of India, New Delhi.

I wish the various agencies of the Government would be more cooperative and appreciative of our efforts. At the age of 85 I am doing my best to do as much as possible for society especially the downtrodden, helpless widows, indigent students who are quite brilliant in their studies but have no means to pursue higher studies to make their careers, the sick, who have no access to treatment: the diabled, and the financially weak, who need regular assistance. HCCT is providing funds to a number of institutions, engaged in welfare activities. All these beneficiaries are appreciative of our approach and assistance. Empowered agencies persons should draw a lesson from these efforts undertaken at the cost of personal comfort and convenience, with long working hours. Today, when there is a general tendency to avoid work even when paid for it there is someone who gives away all his day's earnings, given for his services by consulters, to charity. This amount is Rs.20 lakhs each year.

Pensioners of the State Bank of India, who retired about 15-23 years ago do not get pension at par with the pension of their colleagues, who retired five years ago or are now retiring. There is a wide gap between the amount of their pensions, so much so that the old pensioners in supervisory grade are getting less than the present day pensioners' in clerical grade. This undermines the status and esteem of the old pensioners' who in their time worked very hard for long hours, and now feel frustrated. The bank management needs to do something tangible immediately for redressal of their grievance. Otherwise, it will be a great injustice.

I have made a request in this regard on 3rd June 2009 to Shri Rahul Gandhi, (M.P.) Congress General Secretary whom I consider a unique youth leader who can take care of our grievance. I have reminded him in this matter on the 7th July. I still await to hear from him. I wonder whether communications addressed to all these high up are allowed to reach their hands. If not, how to approach them?

After I failed to receive an acknowledgement/response to my letters of June 3, 2009 and July 7, 2009, addressed to Shri Rahul Gandhi, and two other letters, dated February 9, 2010 and February 18, 2010. I have addressed a letter dated May 12, 2010 to Smt. Sonia Gandhi, Chairperson, UPA Coordination Committee. I wonder whether the letters addressed to Shri Rahul Gandhi and Hon'ble Finance Minister reached them. I have been given to understand by a source that the missive has been given to her office for necessary action. It is virtually impossible today to gain access to persons in positions of authority, who, if they want, can ensure justice for aggrieved persons such as my erstwhile colleagues and me. The former include a host of retired senior State Bank of India officials: Chairman, Managing Director, Deputy Managing Director, Chief General Manager and so on. They are in such a helpless situation that despite their repeated pleas, nobody attends to their legitimate grievance.

The case filed in the Delhi High Court eight years ago in 2002 by seven among many aggrieved persons is yet to be resolved. Four plaintiffs have since expired, and the remaining three may depart

the earth at any time. The eldest of the three is 85 years old. In the evening of our lives, our humiliation and helplessness can well be imagined. The cause of our grievance is explained here. In the case of government pensioners, on reaching the age of 80, 85, 90, 95, 100 years there are accretion slabs. But SBI pensioners, especially old ones (those who retired between 1.2.1984 - 30.6.93), get a pittance as compared to government pensioners, probably 1/3rd of the amount. Starting from the Officer's grade, II, III, IV, V, VI, VII, CGM, Deputy MD, MD, Chairman of the bank all are bunched together, with the maximum monthly pension being Rs.13,164 as on 31.3.2010. This is less than the amount paid to a bank's clerk, who retired later. He gets a pension of Rs.13,962 per month. What a shocking injustice!

What a good time it was that we could approach leaders, no less than the Prime Minister and Deputy Prime Minister, and instant solutions were found, I wish present day rulers could take a cue from all those glorious personalities. We, former senior Bank officials, up to the rank of the Chairman, deserve that our grievances be resolved. Official indifference to our problems all these years has caused frustration and depression.

***- B. G. Dandekar***

****************************

## लेखकांना महत्त्वाच्या सूचना

१) ‘संवाद’कडे कोणत्याही प्रकारचे साहित्य कथा, अनुभव, कविता, प्रतिक्रिया, भटकंती इ. पाठवताना पांढऱ्या फुलस्केप आखीव कागदावरच योग्य समास सोडून सुवाच्च अक्षरात लिहून पाठवावे. कागदाच्या एकाच बाजूस लिहावे. पाठपोट लिहू नये. लेखाची मूळप्रतच पाठवावी. कार्बन किंवा झेरॉक्स प्रत पाठवू नये. असे साहित्य युनिटतर्फे पाठविण्याची आवश्यकता नाही.

२) साहित्य पाठवताना लेखकाने आपला सभासद क्रमांक, संपूर्ण नाव, पूर्ण पत्ता, गावाचे नाव, पिनकोड नंबर, दूरध्वनी क्रमांक लिहून आपली स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.

३) कविता फक्त ३ ते ४ (जास्तीत जास्त) कडव्यांचीच १६ ओळींचीच असावी. कविता स्वरचित असणे जरूरीचे आहे.

४) प्रतिक्रिया पाठवताना ‘संवाद’ मध्ये प्रसिद्ध झालेल्या साहित्याविषयीच असाव्यात. त्यात इतर गोष्टींचा, बाबींचा उदा. असोसिएशन संबंधीचा मजकूर, सूचना, अडचणी, तक्रार, गाऱ्हाणे यांचा समावेश नसावा. त्यासंबंधी सभासदांनी ‘सेक्रेटरी’ पेन्शनर्स असोसिएशनकडे स्वतंत्र पत्रव्यवहार करावा.

५) निरनिराळ्या युनिट सेक्रेटरींनी, युनिटतर्फे साजरे केलेले समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, जनहितासंबंधी केलेले उपक्रम इ. संबंधीचा मजकूर युनिट सेक्रेटरींनी सेक्रेटरी स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन पुणे यांजकडेच पाठवावा.

६) विनोद पाठवताना विनोद अगदी कमीत कमी ओळींचा असणे आवश्यक आहे. जास्त ओळी असलेला (२ ते ३ पॅरेग्राफ) विनोद जागेअभावी छापणे अशक्य आहे.

७) प्रवास वर्णने शक्यतो नवीन पर्यटनस्थळांसंबंधी व प्रवासात अकल्पितपणे ओढवलेली समस्या व आलेला वेगळा अनुभव अशीच असावीत.

८) ‘अभिनंदनीय’साठी सभासद, सहसभासद, मुलगा-मुलगी आणि नातवंडे यांच्यासंबंधीचाच फक्त मजकूर पाठवावा.

**- संपादक मंडळ**

## अभिनंदनीय

आपले कोल्हापूर येथील एक सभासद श्री.बापूसाहेब गायकवाड यांचा मुलगा श्री.किरण याला पंजाब ॲग्रीकल्चरल युनिव्हर्सिटी, लुधियाना यांनी पी.एच.डी. ही पदवी नुकतीच प्रदान केली. श्री.किरण याने प्लॅण्ट बिल्डिंग व जेनेटिक्स या विषयांतर्गत ‘ॲसेसमेंट ऑफ एलियन इंट्रॉग्रेशन लाईन्स ऑफ राईस फॉर हेट्रॉसिस अँड देअर मोलिक्यूलर मार्कर प्रोफायलिंग’ या संबंधात डॉ.टी.एस.भारज व डॉ.एन.एस.बेन्स यांचे मार्गदर्शनाखाली संशोधन करून प्रबंध सादर केला होता. तसेच केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या अधिपत्त्याखालील ॲग्रिकल्चरल सायंटिस्ट रिक्रूटमेंट बोर्ड, नवी दिल्ली यांनी अखिल भारतीय पातळीवर घेतलेल्या नेट परिक्षेत त्याने विशेष प्राविण्यासह यश मिळविले आहे. त्याचप्रमाणे त्याच्या ‘प्लॅण्ट प्रॉडक्टिव्हिटी’ संबंधी पाठविलेल्या शोध निबंधाला ‘जागतिक परिषद २०१०’ ने मान्यता देऊन तो सादर करण्यासाठी तो ट्रेन्ट युनिव्हर्सिटी, ऑन्टेरिओ (कॅनडा) येथे २४ ते २६ ऑक्टोबर २०१० या काळात भरलेल्या परिषदेला जाऊन आला. या उत्तुंग यशाबद्दल श्री.किरण गायकवाड याचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालींसाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

- सेक्रेटरी

## Journey Into The Past To Heal The Future

While I was posted in Colombo in Sri Lanka, I had an occasion to meet a Canadian Lady who visited Sri Lanka to attend a training programme in acupuncture. She visited my official residence with one local person Dr. Fernando for a spiritual Satsanga based on teachings of Paramahansa Yogananda in the year 1987. She told a story about her recollection of an experience in previous life which helped her getting rid of water phobia. In childhood, she would have a fear of accumulated water even to the extent of an inch on the ground or floor. Somehow, she recollected that in the previous life she was a male & used to do foretelling along with a friend. Once they foretold a bad future to a king who out of anger killed them by drowning. By mere remembrance & re-experiencing the event in the previous life she got rid of the false fear. I took her experience on its face value.

In July 1994, a friend & colleague who was posted in the US got for me a book 'Many Lives, Many Masters' by Brian I Weiss, MD, Professor of Psychiatry & Chairman of Psychiatry at Mount Sinai Medical Centre in Miami Beach, Florida, as I was interested in the book. The book is now available in India. He became a past lives therapist in the course of treating the particular patient. He did not believe in anything that could not be proved by traditional scientific methods. But, while treating the patient in 'past life' therapy, the lady patient entered the previous lives in the course of regression and was cured to become likeable normal person. Dr. Weiss in the course of applying the past life therapy to the patient, was able to embark on a new meaningful phase to his own life. 'The Space between the lives' of the patient contained remarkable revelation of his family and his dead son. In the previous lives he had some connection with the patient's previous lives. Two months after the patient was cured, she consulted a well-known psychic astrologer specialized in the past life readings about whom she learnt from a friend. The astrologer asked for only the date, time, and place of her birth. To the amusement of the patient, the astrologer validated most of what was discovered under hypnosis.

Recently, I read an article in Jan 2010 issue of 'Life Positive', monthly magazine, by Blossom Furtado,. 'Unlock the past to heal the present'. He holds a master's degree in alternative medicine, is a past life therapist and a life-coach counselor. His website is www.hypnotherapyschoolindia.com.To read the articles on line visit http.//www.lifepositive.com/articles/pastlife regressiontherapy. The article is on the experience of 48 year old well educated lady who wanted to divorce her husband as he developed some disability from the waist downwards on account of which she suffered for over a year and felt that it was not curable.

When she underwent a process-driven therapy that Furtado follows for relationship issues, she was facilitated into viewing past 3 lives when she had the same husband. She used to get similar sickness and her husband would take care for 10 to 15 yrs till her death. In one of the lives, she suffered due to fall while riding horse but the sickness was similar. In the present life, the husband got similar sickness. After the journey into the past life she let go all anger and frustrations. They went to the US for treatment of her husband. To put in the words of Furtado, 'they perhaps will now live together to a ripe old age and need not face the same situations in their next life'.

This reminds me of behavioural science inputs in the training programmes at the State Bank staff college at Hyderabad. These inputs were to get rid of ill effects of the 'past life' on the present. A constantly criticized child can lose confidence and self esteem after growing up. The behavioural science experiment I remember was of a participant having grudge against father who was made to sit in a chair and address empty chair imagining his father therein. Thereafter he was asked to sit in the father's chair & address to himself looking at empty chair from where he addressed the father. In that process, I remember to have seen the participant discharging ill effects of the past.

I also remember a daughter-in-law of a dear colleague who is a niece of another dear colleague who got rid of problems with the help of a past life therapist. A TV serial from 9.30 pm from Monday to Friday on the channel 'NDTV Imagine' titled shows past life therapy used to be in progress conducted by Dr Trupti Jain. What was shown in the programme is realistic and not fictitious. It was similar to Dr. Weiss's experiences in the book. The Art of Living (ph # 022-31099999),if approached, may suggest name of past life therapist from their panel.

This establishes connection between the past & the future and a way to eradicate the ill effects of the past to heal the future. After the experience Brian Weiss had in treating the patient, he began to meditate. Advanced meditation is called by

Paramahansa Yogananda as 'Kriya Yoga' 'Kriya Serves to prolong life and enlarge consciousness to infinity. When that happens there is no need of past-life therapy.

(Note:- I have given details of references to enable the interested persons to have access to the required information through internet. More information on Kriya Yoga will be available in 'Autobiography of a Yogi' by Paramahansa Yogananda).

***- S V Naik***

Mumbai 400 069; Cell # 9821127616

## निरोप गीत

नको नको ती भाषण गाणी
होईन ऐकून उदासवाणी
नको वर्गणी नको भेटवस्तू
सर्वेपि सुखिन: सन्तु ।।१।।

अल्पकाळात या सेवेच्या
हात घेतला मदतीचा
दिली घेतली ममता-माया
सर्वे सन्तु निरामया ।।२।।

बँक असे ही दुसरी माता
लीन होऊनी ठेवी चरणी माथा
एक दिलाने सर्व गर्जतू
सर्वे भद्राणि पश्यन्तु ।।३।।

क्षमायाचना करूनी आपणा
सुयश, सुबुद्धि दे सर्वांना
ईश चरणी करुनी प्रार्थना
मा कश्चित् दु:खमाप्नुयात् ।।४।।

- **गिरिजा र.पागनीस,** माहिम
दूरध्वनी २४४५५२७४

## अभिनंदनीय

आपले सभासद **श्री. सोमनाथजी भोर** यांनी 'शिक्षण प्रसारक मंडळी-पुणे-तलाव विभागा'च्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मार्सेली (फ्रान्स) येथे भर समुद्रात बोटीतून मारलेल्या जगप्रसिद्ध उडीच्या १०० वर्षे पूर्तीनिमित्त आयोजित केलेल्या 'पाण्यात उडी मारणे' स्पर्धेत 'मुटका' प्रकारची उडी दुसऱ्या मजल्यावरून मारून तिसऱ्या क्रमांकाचे बक्षिस पटकावले. ३० ते ७० या वयोगटातील पुरूष स्पर्धकांमध्ये भाग घेऊन वयाच्या ६७ व्या वर्षी श्री. भोर यांनी मिळविलेल्या या स्पृहणीय यशाबद्दल त्यांचे असोसिएशनच्या वतीने हार्दिक अभिनंदन.

**- सेक्रेटरी**

## *डोंगरदऱ्यातील दरी*

शाळा कॉलेजपासून गड-किल्ले चढणे, ट्रेकिंग, निसर्ग सौंदर्य पाहणे, एखाद्या गडावर पावसात मनसोक्त भिजत चढणे या सर्वांची आवड जपलेली. खूप भटकंती केली. अगदी किल्ले रायगडावरसुद्धा चढाई केली. रायगडावरून सभोवतालचा दिसणारा परिसर खालच्या बाजूची हिरवाई मनाला आनंद देणारी. गड चढण्याचे श्रम हलके करणारी. सिमला, कुलु-मनाली, डलहौसी, नैनीताल, मसुरी, दार्जिलिंग, गंगटोक, मनिकरण सगळे एकाच हिमाचलाचे भाग, पण प्रत्येकाचे स्वत:चे वेगळेपण, स्वत:चे सौंदर्य अप्रतीम. उंच उंच वृक्षांनी, तऱ्हेतऱ्हेच्या वनस्पतींनी, अनोख्या आकर्षक फुलांनी नटलेला पर्वतमाथा अवर्णनीय. तेथील निरवता, शांतता, भव्यता फक्त अनुभवण्याचीच गोष्ट आहे. सांगून ते समजायचं नाही. आपण उगीच म्हणतो दुरून डोंगर साजरे. पण प्रत्यक्ष डोंगराचा अनुभव काही वेगळाच. इतक्या उंचीवर गेल्यावर स्वत:लाच धन्य वाटते. आपण किती उंचीवर आलो याचा विचार मनात येतो. पण त्याचवेळेला पलिकडून उतार सुरू असतो तो दुर्लक्षून चालत नाही. डोंगराबद्दल मनात निर्माण झालेला आदर निश्चित कौतुकाचा मुलाहिजा न ठेवता डोंगर महाराज निमिषार्धात, अगदी पापणी लवेपर्यंत आपल्याला खोल दरीत ढकलण्यास मागेपुढे पहाणार नाहीत. आपण केलेल्या स्तुतीला मुळीच भुलत नाहीत. खाली दरीचे सौंदर्य पहायला जिवंत रहाणे आवश्यक आहे. नाहीतर डोंगरावर चढण्याआधी खालच्या दरीपासून सुरूवात केली पाहिजे. घनदाट झाडी, झाडा झुडुपांचा वेलींचा गुंता, वर पासून आलेला पालापाचोळा, काटक्याकुटक्या थोडक्यात भीषण सौंदर्य बघायला मिळते. वर डोंगर माथ्यावर चढायचा गर्व क्षणार्धात नाहीसा होतो. आता खाली दरीत यावे तर ती दरी आपल्याला स्वत:तच सामावून घेते. वेलींच्या जाळ्यात अडकविते. दाट झाडीत वाट चुकविते. वर चढण्याचे सर्व मार्ग बंद होतात. खालच्या खालीच गुदमरायला होते. डोंगराचा कडेलोट करण्याचा उन्मत्तपणा, तर या दरीचा स्वत:त विलीन करण्याचा कपटीपणा, पुढे काय? पुढे काय? या उत्सुकतेपोटी आपण चकवा लागल्यासारखे फिरत रहातो. ती दरी काही आपल्याला स्वत:पासून लांब करीत नाही, डोंगर स्वत: जवळ राहू देत नाही तर दरी स्वत: पासून दूर होऊ देत नाही. डोंगर व दरी यांच्या या स्वभावात केवढी ही दरी! दोन्हीही नाशच करतात पण वेगवेगळ्या तऱ्हेने. फार उंचावर जाणे ही धोक्याचेच व फार खोल जाणेही धोक्याचेच.

**- सौ. कुंदा गो. मुळे,**

सावेडी(नगर) भ्रमणध्वनी : ९८९०८६३८६९

## Maya Jal, nay Maya Effect

Nandan and I first met at a Wedding Reception. We were sitting next to each other in the reception hall. Either we were somewhat early or the bride and the groom were taking time to arrive at the reception hall. Just to pass time we exchanged notes about each other. Nandan looked well built and well dressed. He worked as Production Engineer at a well known company. I too informed him that after post graduation I was working at a recognized Institute of Social Work. We came to know that we lived not far from each other and further that we both were single and unmarried.

May be a month later, I came across Nandan at a restaurant "Nagpuri That", a place not far off from our living quarters. The restaurant was on a popular street housing number of restaurants serving different cuisines, cybercafés, Beauty Parlors and an ultra modern gym. No wonder it was a frequented street from younger crowd.

As I entered the restaurant I saw Nandan sitting alone at one of the corner tables. Seeing me, he waved his hand in the air suggesting me to take a place at the same table. Since I was alone, I gladly accepted his invitation.

Nandan, like me, did like the place, especially the typical Nagpuri dishes served there. And the reason was same for both. I lived in Nagpur till I completed my SSC exam. Nandan had studied up to junior college in science faculty in Nagpur. On transfer of our fathers both had shifted to Pune, completed further education there and were now employed in Pune. The topics of our conversation were the usual ones: the good and bad things of Nagpur, the variety of Nagpuri cuisine, the easier approach to day to day matters by Nagpur folks, etc. It became apparent that we both missed Nagpur. Maybe for that reason we agreed to meet each other at the same place at least once a month.

Our next meeting was about a month later at the same place. The weather was good, the drinks were good and we both were in a light and somewhat expansive mood. As is normal with young single men the topic easily shifted to young girls. Nandan told that he regularly visited the gym on the same street. Apart from the fact that it was a very well equipped gym, a good number of good looking figure and conscious young girls were members of the gym. I heartily agreed with him that it was a really convincing reason. Nandan became still easier in talk. He added that in particular he liked two girls visiting the gym, both tall, slim and with charming looks. Another good thing about them was that their first name was the same, namely Maya. I did not find anything interesting about the name. Many a persons fancy a particular name. Nandan then said he knew no way to introduce himself and develop friendship with them. Indeed both Mayas are so good. "Oh! If that is your problem I may be able to help you." Continuing further I said, "The principal trainer Sanjay at the gym and I know each other well. He is very popular with the members of the gym. I am sure he will be of needed help to you."

Next week, I arranged meeting between Sanjay and Nandan. Sanjay assured that he should be able to help Nandan. About a month later when we met at our usual place of meeting, the Nagpuri That, Nandan looked very happy and enthusiastic. It seemed that Sanjay had done his job pretty well. Nandan was on quite friendly terms with both Mayas. Occasionally he had taken them to nearby restaurant, of course not both at a same time. Nandan was smart that way. He could get full information on both, that is Maya Desai and Maya Bendre. Both came from good educated families. After completion of graduation at B.Pharm., Maya Desai was working with a local pharmaceutical firm. Maya Bendre was doing advanced studies in modern art paintings. Both were lively and smart. Of course Maya Desai was really beautiful but Maya Bendre played badminton well. While Nandan was impressed by both .I was somewhat taken aback by Nandan's statement. It is natural that a young man would like a beautiful girl but seldom would he equate her with a girl who played badminton well. This definitely looked unusual. Also in this meeting I observed that their first name, "Maya" had some special effect on Nandan. I just told Nandan, "I wish you best of luck and go ahead with the girl you like most."

For the next three months, however, I could not meet Nandan. I had a work assignment outside Pune. One Saturday evening after my return I was in a

relaxed mood. I invited Nandan to our favorite restaurant. Nandan did not seem rather keen. With some persuasion from my side he agreed to come. Nandan looked rather dejected and, as they say, crestfallen. I enquired what mattered with him that made him sad and unhappy. Nandan desperately wanted someone to open up his heart.. He started almost in full force "Well everything is over with Maya Desai as also Maya Bendre. Maya Desai is getting married to an MBA working in a pharmaceutical company in Nasik. Maya Bendre is leaving in a month or two to Paris for advanced studies in abstract art. That may take a year or two." To cheer him up and to calm him down I said "Oh! That's not a big problem. Two years is not a long period. From Pune you can be in touch regularly on phone / Internet. Also, I know you can afford a holiday to Paris and be in touch with her." This however failed to cheer up Nandan. Still in the same cheerless tone he added," I do not think this would work. Sometime back I suggested to her that before she left for Paris I would give a special send off party in her honor. Also I may take holiday and meet her in Paris. She looked totally unimpressed. In a somewhat formal way she just thanked me adding that the next two months or so she would be very busy completing all the formalities. She just would have no time for her gym friends." I felt very sorry for Nandan. A young well educated man like him should have at least found out whether any of the Mayas had softer inclinations for him. In a very sincere note I told Nandan that there were number of good looking girls in Pune: educated, charming and good at some sports. More importantly Nandan was really a very eligible bachelor. What if the girl name was Maya or someone else? Nandan had calmed down but was not totally convinced with what I was saying. He still seemed quite smitten by both Mayas or "Their Jal".

Next two or three months we hardly met. Nandan somehow or the other avoided the subject of Maya or any other girl. I felt it was okay for the time being. The Maya effect should be over with passage of time.

And things happened as I had thought. Only a few months later Nandan phoned me and invited me. ,this time, not at our favorite restaurant but at a costly restaurant in midtown area. We met at the scheduled time. Nandan looked very cheerful and ebullient. After we were comfortably seated and ordered our favorite drinks Nandan almost burst out with joy and excitement "Congratulate me, I am engaged to a really nice good looking and graceful girl. She is at present working as a lecturer in Pune. Real great thing about her is that her name is Maya Sarnaik. She plays badminton well. In fact she had played for her college. Just see what luck can be and how things happen. I feel so good. It was nice that Nandan could get a girl of his liking. Yet associating her with name Maya and the game of badminton suddenly stirred something that was lying like dormant inside me. My school days in Nagpur, my attending intercollegiate badminton tourneys with my cousin who was a keen badminton player. One by one the things surfaced very clearly. Maya Sarnaik was a teenager, tall, slim and very graceful. And a top ranking badminton player amongst collegiate. Now I remember while I did not much like the game of badminton, Maya Sarnaik the badminton player impressed me very well. No wonder Nandan was infatuated by her game and personality, maybe they had studied in the same college. Still it seemed very absurd and difficult to understand even after seven-eight years of leaving Nagpur, the mesmerizing effect of Maya Sarnaik the great badminton player of Nagpur was still on Nandan. It was now clear why the first name Maya and the game of badminton and the girls associated with these two things affected Nandan. In a way Maya Desai or Maya Bendre or his present fiancée Maya Sarnaik from Pune were some sort of replacement for Maya Sarnaik of Nagpur. Nandan really seemed lucky. Otherwise such a strange obsession would have adversely affected anyone's life. It seemed that Nandan will now find a total replacement in his fiancée and lead a happy life. Strange thing indeed. It only tells us that those who are good and honest at heart God helps them.

With all the best wishes, I left Nandan that day, on a very happy and a positive note.

- ***Sudhakar Chandurkar***
Mumbai 400051
(M) - 9769072669

## कन्फेशन

या गोष्टीला आता २०/२५ वर्षे उलटून गेली असतील. पण कॉलेजमधले ते दिवस आठवले की तो सुखाचा काळ डोळ्यासमोरून भरभर सरकू लागतो आणि मग एक व्यक्ति आठवते. जिचा आपल्यावर त्याकाळी भरपूरच प्रभाव पडला होता. त्याची आठवण विसरू म्हटले तरी विसरणे शक्य होत नाही.

एका पारसी मध्यम वर्गीय कुटुंबातील मी व माझा भाऊ दोनच भावंडे. आई-वडिलांनी तसे मला काहीच कमी पडू दिले नाही. सेंट झेवियर्सला मी इंटरआर्टसला होते. टेबलटेनिस माझा आवडता खेळ. त्यावेळी कॉलेज व्यतिरिक्त मी इतर बॉम्बे स्टेट टूर्नमिंटमध्ये भाग घेत असे. असेच एकदा परदेशी टीमचे खेळाडू आलेले असताना त्यांचे फोटो काढण्याच्या निमित्ताने एक सडपातळ, उंच, अतिशय तरततरीत अशा २६/२७ वर्षाच्या तरुणाला घेऊन आमचे कोच आले. आमचा सर्वांचा ग्रुप फोटो काढून झाला. त्यांनी ओळख करून दिली. हे स्टेट बँकेत काम करतात. फोटोग्राफी त्यांचा छंद आहे. ते स्वत: एक चांगले स्पोटर्समन आहेत. टेनिस, बॅडमिंटन उत्तम खेळतात. त्यांचे नाव अरूण होते. नंतर कित्येक वेळा तो मला खेळाच्या निमित्ताने, कधी मी स्टेट बँकेत आमच्या कोचना भेटायला जात असे त्यावेळी भेटायचा. अतिशय सुसंस्कृत, बोलण्यात चतुर, हरहुन्नरी अशी त्याची पर्सनॅलिटी होती. सदा उत्साही, आनंदी कोणतीही गोष्ट सहजपणे स्विकारण्याची वृत्ती ह्यामुळे तो मित्रमंडळीतही आवडता होता. हळूहळू आमची ओळख वाढत गेली. कोणत्याही वयात आलेल्या मुलीला आवडावा असाच तो होता. त्याने कित्येक वेळा मला सिनेमाला सोबत येशील का म्हणून विचारले. आम्ही त्याकाळी गाजलेले कित्येक इंग्रजी चित्रपट एकत्र पाहिले. हॉटेलमध्ये चहाकॉफीसाठी पण तो मला घेऊन जायचा. एक चांगला मित्र म्हणून मी एकदा घरी बोलावून त्याची माझ्या आई वडीलांशीही ओळख करून दिली. मी त्याच्यात गुंतत चालले की काय अशी आशंका मला येऊ लागली. तो तर चांगलाच गुरफटला होता. पण कधीही बोलण्यातून किंवा वागण्यातून जराही मोकळीक घेतली असे कधी केले नाही. आजकालच्या उताविळ तरुण-तरुणींच्या मैत्रीपेक्षा फार वेगळी आमची मैत्री होती. कधी चुकूनही त्याने मला उगीचच स्पर्श केला असे आठवत नाही. कधीतरी सूचक बोलण्यातून त्याची भावना मला जाणवायची पण माझ्याकडून त्याला मी कधीच प्रोत्साहित केले नाही. आपण वागतो ते बरोबर नाही हे मला कळत होते. पण त्याचा सहवास मला सोडवत नव्हता. मी त्याच्याशी लग्न करणारच नव्हते. आयुष्याच्या जोडीदाराविषयी माझ्या काही अपेक्षा ठाम होत्या. तो भरपूर पैसेवाला, गाडीबंगलेवाला असावा असे मला वाटायचे. कारण माझी वृत्ती भरपूर चैनीचे जीवन जगणारी होती. बँकेतल्या क्लार्कला पगार किती मिळणार व आपण संसार काय सजवणार ? पण त्याच्याबरोबर फिरून मी त्याला आशेवर झुलवत ठेवले आहे, याकडे मी सोईस्करपणे कानाडोळा करत होते. परत आमचे धर्म वेगळे व पारसी धर्माव्यतिरिक्त इतर लोकांशी रोटीबेटी व्यवहार म्हणजे एक तऱ्हेने जातीचा बहिष्कार सहन करणे हे त्याकाळी होतेच. माझ्या आईनेही आमची वाढती मैत्री पाहून मला तसे सावध केले होतेच. तरीपण एवढ्या सुस्वभावी माणसाचा सहवास मला सोडवत नव्हता. एकाअर्थी मी स्वार्थीपणानेच वागत होते.

त्याच सुमारास एका सुखवस्तू पारसी कुटुंबातील तरुणाकडून मला लग्नाची मागणी आली. आईवडिलांनीही उचलून धरली आणि माझे लग्न ठरले. ही बातमी अरुणला कशी सांगायची म्हणून काही दिवस मी टाळत राहिले पण माझ्या आईकडून त्याला नंतर ती कळलीच. त्याने कसलीही प्रतिक्रिया व्यक्त न करता माझे अभिनंदन केले. लग्नालाही तो आवर्जून हजर राहिला. लग्नानंतरची चार-पाच वर्षे आम्ही परदेशीच राहायला गेलो. मध्यंतरी माझ्या मोठ्या मुलीचा जन्म झाला. त्या गडबडीत मी अरुणला विसरूनच गेले होते. मी त्याच्याशी कधी संपर्क साधण्याचा प्रयत्नही केला नाही. पण योगायोगाने एकदा चर्चगेट स्टेशनवर मला तो भेटला. त्याने अजून लग्न केले नव्हते. त्याला घरी बोलावून मी त्याची पतीशी ओळख करून दिली. तोही मोकळ्या मनाने कधी काही घडलेच नव्हते अशा तऱ्हेने बरेचदा घरी येत होता. त्याचे लग्न न झाल्यामुळे प्रत्येक वेळी मला फार अपराधी वाटायचे. त्याने माझ्यावर खरोखरीच प्रेम केले म्हणून तो लग्न करत नसेल असे तर नाही ना असे वाटून मी अस्वस्थ व्हायचे पण मी त्याला तसे विचारण्याचे धाडस करू शकत नव्हते. बरेच दिवस असेच गेले. मी मुद्दाम त्याला माझ्या घरी बरेचदा जेवायला बोलवायचे. कधीकाळी आम्ही एकत्र सिनेमालाही जायचो पण मला नेहमी वाटायचे की एका चांगल्या तरुणाच्या एकाकी जीवनाला मी जबाबदार तर नाही ना ? त्याला भेटलेल्या, सांगून आलेल्या मुलींची तो माझ्याशी तुलना तर करत नसेल? त्याच्या घरच्या परिस्थितीबद्दल मी त्याला कधीच विचारले नाही. त्यानेही आपण होऊन ते कधी सांगितले नाही. मी मनात अशांत होते.

अशाच एका संध्याकाळी अनपेक्षितपणे मला त्याचा फोन आला. तो फार आनंदात वाटला. ''तनाझ, मी लग्न करतोय.''

ज्या दिवसाची मी वाट पाहत होते तो दिवस आज आला होता. त्यावेळी त्याचे वय चाळिशीच्या आसपास होते. अंशत: का होईना माझी मनाची रूखरूख शांत झाली होती. मी लगेच अभिनंदन करून दोघांना घरी येण्याचे आमंत्रण दिले. त्याची भावी पत्नी सालस, निरागस चेहऱ्याची तरुणी होती. त्या दोघांना एकत्र पाहताच माझी खात्री पटली ह्याच्या आयुष्यात ही नक्कीच बहर फुलवील. मला अतिशय समाधान वाटले.

ते दोघे जोडीनं घराबाहेर लांबलांब जाताना मी डोळे भरून त्यांना पाहत होते. यापुढे कधीच मी त्याच्याशी संपर्क साधणार नव्हते. एक चांगला मित्र गमावला या दु:खापेक्षा त्याचे आयुष्य सुखाचे जाणार आहे ह्या आनंदात मी भरून पावले होते.

**- सौ.शैला म्हात्रे**, ठाणे (मुंबई)

दूरध्वनी - २५८८७६४२

## जगण्याचं टॉनिक

आठवली एका अशाच निवांत, समयी मला माझीच भार्या
काव्य सुचू लागले असे जणू, मोरोपंतांची आर्या ।
तत्क्षणीच एक तयार झाली, भावनाबद्ध सुंदर कविता
हर्षभरित झालो मी कारण की, पद्य सुचू लागले आता ।
निमित्त होते मिलनाच्या आमच्या, अकराव्या वाढदिवसाचे
प्रेरणास्रोत जिने दिला स्मरण, त्या सहधर्मचारिणीचे ।
वयाचा चाळीशीला सुरू झाला, हा अनोखा काव्यप्रवास
काव्यपुष्प मी गुंफीत गेलो, प्रसंगा प्रसंगाला खास ।
रौप्यमहोत्सवी दिन मिलनाचा, उगवला चौदा वर्षांनी
शब्दांकित केले त्या आठवणींना, मी नवीन शब्दसुमनांनी।
जाणवले तेव्हाच मला की, कविता माझी खूप बहरली
वनवास तिचा संपला आणि, यौवनात ती प्रवेशली ।
वृत्त नाही अलंकार नाही, मुक्तछंदात मी विहरत गेलो
भावना माझी जागृत ठेऊन, काव्यरसात मी डुंबून गेलो ।
व्यक्तीसापेक्ष काव्यातून मी, दृष्टीसापेक्ष काव्यात आलो
आनंदित झालो मी मनाने, कारण मी एक कवी झालो ।
वृद्धत्व शरीराला अटळ आहे, जी नैसर्गिक प्रक्रिया आहे
कवितेला मात्र चिरतारुण्य इच्छितो, कारण.....
तेच माझ्या जगण्याचं टॉनिक आहे ।

**- शरद महाबळ**

भ्रमणध्वनी - ९३७२४२८३२२

# 'प' ची पचडी

पंढरपूरच्या पार्वतीकाकूंनी पुष्करच्या पपांबरोबर प्रमिलाबाईंसाठी प्रसाद, पोथी पाठवली. पपांनी पुष्करला प्रमिलाबाईंकडे प्रसाद, पोथी पोहोचवण्यास पाठवले.

प्रभातसमयी प्रसाद, पोथी पोहोचवण्यासाठी पुष्कर पळाला. पदपथावरून पळता - पळता पुष्करने पायवाटेपलीकडच्या पटांगणात पिवळी पिशवी पडलेली पाहिली. पुष्करच्या पुढे पळणाऱ्या पुळचट पपूनेही पिशवी पाहिली. पपू पिशवी पकडून पळणारसे पाहताच पटकन पुष्करने पिशवी पकडली. पुष्करने पिशवी पकडलेली पाहताच पपू पळाला.

पुष्करने पिशवीत पाहिले. पिशवीतील पाचवीची पाच पाठ्यपुस्तके, पैशाचे पाकीट पाहून पळभर पुष्करला प्रश्न पडला. पण पुष्करने पाकिटावरील पप्पांचे परममित्र पारकरकाकांचा पत्ता पाहिला. प्रमिलाबाईंकडे पळण्याऐवजी पारकरकाकांकडे पळू पाहणाऱ्या पुष्करने पायवाटेपलीकडील पर्णकुटीसमोर पारकरकाका, पुष्पाकाकूंना पाहिले.

''पारकरकाकाऽऽ! पुष्पाकाकूऽऽ'' पुष्करने पुकारले. पुष्पाकाकूंनी पुष्करजवळील पिशवी पाहिली. पिशवी पाहताच ''पुस्तकांची पिशवी ! प्रकाशच्या पुस्तकांची पिशवी पाहा.'' पुष्पाकाकू पुटपुटल्या. पारकरकाकांजवळ पोहोचल्यावर पुष्करने पारकरकाकांना पिशवी परतवली.

पारकरकाकांसारख्या प्रामाणिक पोलीसाला पुष्करचा पापभिरूपणा पसंत पडला. पुष्करने प्रामाणिकपणाप्रित्यर्थ पसंतीचे प्रवासवर्णनपर पुस्तक पटकावले.

पुष्करचे पपा पारितोषिकाचे पुस्तक पाहून परमसंतोष पावले.

पाचवाजेनंतर पपांनी पुष्करहाती प्रमिलाबाईंना पोथी, प्रसादाचा पुडा पोहोचविला. प्रसाद, पोथी पाहून प्रमिलाबाई प्रसन्न पावल्या. प्रमिलाबाईंचे पती प्रभाकरपंतांनी पुष्करबरोबर पपांसाठी पेढ्यांच्या प्रसादाची पुडी, पपया पाठवल्या. प्रमिलाबाईंकडे पाणी, पेप्सी पिऊन पुष्कर परतला.

प्रयत्नांती पकवलेली 'प'ची पचडी पसंत पडेल?

प्रश्नच पडलाय पहा!

**- सौ. शैलजा वि. टेंभुर्णीकर**

अहमदनगर - ४१४ ००३

फोन - ०२४१ - २४२४९१०

## गणू आणि गण्याच्या गप्पा!

गणू म्हणजे गणेश आणि गण्या म्हणजे गणपतच्या गप्पा आजही नेहमीप्रमाणेच रंगल्या होत्या. आजचा त्यांचा विषय होता ''खासदारांचा पगार!''

गणू : गण्या, अरे तुला आजची बातमी समजली का? आपल्या खासदारांचे पगार वाढलेत एकदाचे. आता त्यांचा पगार वाढल्याने व हा प्रश्न मिटल्याने त्यांना आपल्या देशाच्या विकास कामाकडे लक्ष द्यायला वेळ मिळेल. आमच्या पगारवाढीपासूनच ते त्या मागणीसाठी झटत होते बिचारे!

गण्या : म्हणजे गणू आपण निवडून दिलेले खासदार नोकरी करतात? त्यांना पगार पण असतो?

गणू : मग, फक्त त्यांच्या नोकरीला 'समाजसेवा' म्हणतात. त्यांनाही पोटपाणी आहे गण्या. आपल्याला महागाई वाढली तशी त्यांना नाही का वाढली? अरे आपल्याला काय मेथीची भाजी १२ रूपयाला आणि त्यांना ६ रूपयाला आहे का? आपल्यासाठी पेट्रोल ५५ रूपये लिटर आणि त्यांना काय २५ रूपये लिटर मिळते का? तू शेती करतोस ना? मग खासदारांची मेथी भाजी वेगळी व सर्व समाजाची वेगळी अशी पिके घेता येतात का? नाही ना! मग त्यांचेही पगार वाढले पाहिजेत की नाही गण्या?

गण्या : माझ्या डोसक्यात काही या मोठ्या गोष्टी शिरत नाहीत बघ. तुझ्यासारखे मी पण शिकलो असतो ना गणू तर मलाही कळाले असते. पण तू सांगना समजून. मला एकच माहीत आहे, पूर्वी तर म्हणे आपण निवडून दिलेल्या नेत्यांना पगारच नसायचा. ते आपले पुढारी, तुम्ही काय म्हणता त्यांना पहा, अंऽऽ हां मंत्री साहेब १ रू. फक्त दाखववायला पगार घ्यायचे. कारण ते म्हणायचे समाजसेवा/देशसेवेचा पगार कसा घ्यायचा. गांधी/सावकरांनी देशसेवा केली त्यांनी काय पगार घेतला काय? त्यांनी तर घरातून पैका खर्च केला म्हणे. खरं काय रे गणू?

गणू : हेच तर तुम्हा अडाण्यांना कळत नाही बघ. अरे आता जमाना बदललाय बाबा. गांधी/सावरकर स्वातंत्र्य मिळवण्याच्या कल्पनेने झपाटलेले होते. त्यांना व्यवहारज्ञान नव्हतेच मुळी. घरचे खाऊन लष्कराच्या भाकरी भाजायला हे काही 'रामयुग' आहे का? 'कलियुग' आहे कलियुग! आणि तू म्हणतोस तसे कोणी एखाद्या मंत्र्याने कधी १ रू. पगार घेतला असेल ना, तर त्यांना मानधनच लाखो रूपये मिळायचे. नोकर भत्ता, प्रवासभत्ता, महिन्याकाठी लाखो रूपयाचे फोन बिल, गाडी, ड्रायव्हर आताही आहे म्हणा. पण महागाई वाढली ना? ते तरी काय करतील? एवढी तुमची सेवा करायची तर पोटभर अन्न नको का मिळायला त्यांना? तुम्ही ना गण्या फार संकुचित विचार करता.

गण्या : ते काय बी समजत नाही बाबा. पण गणू एक शंका हाय, एवढ्या सोयी थाटमाट तर आपल्या राजे राजवाड्यांचाही असायचा. ते जाऊनही आपल्या पदरात काम पडलं रं?

गणू : गण्या, गण्या अरे समजत कसं नाही रे तुला. 'खासदार काय माणसं नसतात आणि आपल्या देशाने प्रगती करू नये का रे गण्या? इतर देशाच्या मागेच रहावं का नेहमी? अरे अमेरिका/इंग्लंडमध्ये खासदारांना असेच पगार असतात. मग आपल्या देशात का नको?

गण्या : ते नायबा सांगता येणार. पण मागे एकदा तूच म्हणाला हुतास नां? फारेनच्या १ रू. चे आपल्याकडे खूप रूपये हुतात म्हणून आणि तिकडे म्हणे उत्पन्नही परतेक माणसाचे जादा असतंय म्हणून? आन् कारं गणू, त्यांच्या पगाराशी आपली तुलना कशापायी करायची रं? जर करायची तर सगळ्याच बाबतीत करायला पाहिजे बरं कां? म्हणजे आपलऽऽ हे बघ तिकडचे रस्ते, इज,पाणी, घरं किती छान अन् सस्त असतंय म्हणे. परत तिकडं खासदारांना पगार जास्तच, तर बाकीच्या कामगारांना मोल मजूरांनाही आपल्या परीस खूप पगार असतो म्हणे. मग गणू त्यासारखे आपल्याकडे, तुमच्या सारख्या हापीसात काम करणाऱ्यांना मोलमजूरांनाही पगार द्यायला नगं का? 'लाखो रूपये? छान रस्ते, शाळा, कालेज, दवाखाने पण पाहिजे नारं?' का फक्त खासदारांना पगाराशी बरोबरी करायची अन् बाकी सोडून द्यायचं नाय, पटतं कां तुला?'

गणू : गण्या गण्या कसले रे संकुचित विचावर तुमचे. खासदारांना काय घरदार नाही का? त्यांना सर्व सुख सोयी असतील तरच ते कामाकडे लक्ष देऊ शकतील ना? नाहीतर सारखे लक्ष घराकडे मग देशाचा विकास त्यांनी कसा करायचा रं?

गण्या : आर पण माझं मन म्हणत आ, नाय तुला न का पटेना पर यातले निम्मे खासदार तर म्हणं कोट्याधीश आहे, काही बऱ्याच खासदारांवर कोर्टात केसेसी चालू हाईत. मग ही वाढ कंच्या तत्त्वात बसतं रं? तुमच्या हापीसात, तर म्या ऐकतो, केस असली, तुरुंगात जाऊन आला, संस्पेंड की काय ते करतात म्हणं?

गणू : आर ते काय ऑफीस आहे का? राजकारण असतं ते. तुला कळतं का राजकारण किती अवघड असतं ते. प्रत्येक प्रश्नाची त्यांना चर्चा करायची असते. निर्णय घ्यायचे असतात. देशाचा गाडा पुढं न्यायचा असतो.

गण्या : पण म्या तर ऐकलंय की चर्चा करायला, प्रत्येक खासदार प्रत्येक वेळी हजर असतोच असं नाही. चर्चेपेक्षा त्यांची भांडणं मारामाऱ्याच जास्त होतात. एवढे होऊनही निर्णय न्हाय झाले तर ते समिती की काय नेमतात मग ते सिमला, काश्मीरला बैठका घेतात. वेळ पुरला नाही की मुदती वाढवून घेतात. अन् मग सरकार त्यांनी केलेल्या सूचना मान्य करते. झाले गाडा आपसुकच पुढं चालत रहातो.

गणू : अरे ती कामाची पद्धत असते बाबा आणि मग खासदारांची पगारवाढ व्हावी ही शिफारस पण अशाच समितीने केली होती गण्या. मग सरकारचे काय चुकले सांग बघू?

गण्या : न्हाय, न्हाय, पण कारं गणू आता ते आमदार नगरसेवक महापौर की काय म्हणत्यात त्यांचेही पगार वाढतील का रं? न्हाय म्हणजे मागे तू म्हणाला हुता की 'इज' तयार कराया सरकारकडं पैका नाय, ते कोणत्या मोठ्या बेंकीकडून कर्ज घेऊन मग करणार हाय, तसं एवढी पगारवाढ द्यायलाही पैका नसला तर कर्ज घ्यावं लागल कारं?

गणू : गण्या आपण सामान्य माणसं राजकारणातलं काही कळतं का? तू नका विचार करू जास्त!

- **भरत जैन**, नाशिक
मो. ९५०३०५७९९७

## ।। स्मरणशक्ती ।।

आज सकाळी काय भाजी खाल्ली ते रात्री आठवत नाही
पण पहिलीला कोण शिक्षक होते
ते अजूनही विसरलो नाही ।।१।।

१० वी च्या वर्गातील मित्रांची नावे अजूनही स्मरतात
पण नातवंडांची, भाच्यांची व पुतण्यांची नावे विसरतात ।।२।।

कॉलेजच्या रॅगिंगची मजा आजही चांगली आठवते
पण महिन्यापूर्वी भेटलेला
परत समोर आल्यास नाव विचारावे लागते ।।३।।

लग्नाचा पहिला दिवस कोणी विसरत नाही
पण रात्री पडलेले स्वप्न सकाळी आठवत नाही ।।४।।

नोकरीचा पहिला दिवस आजही स्मरणात आहे
'संवाद' मधून काहींची नावे वाचून
पुनर्भेटीचा आनंद लाभत आहे ।।५।।

देवानेच मानवाला बहाल केले आहे स्मरण व विस्मरण
सुख ते स्मरावे व नामस्मरणात दु:ख विसरावे
हेच खरे जीवन ।।६।।

- **गोपाळ मुळे**, सावेडी (अहमदनगर)
भ्रमणध्वनी - ९८९०८६३८६९

## व्यक्तिविशेष लेखन - एकच आस, एकच ध्यास

लेखनाच्या ध्यासाने झपाटलेले एक व्यक्तिमत्व म्हणजे आपल्या असोसिएशनचे सभासद श्री. सदानंद मुकुंद गोखले. गेले चाळीस वर्षे ते सतत लिहित आले आहेत. ५ ऑक्टोबर १९६९ रोजी 'सकाळ' दैनिकाच्या रविवारच्या पुरवणीत त्यांची पहिली कथा 'तगाईबंदी' प्रसिद्ध झाली. प्रत्येक लेखकाला आपले लिखाण कुठेतरी प्रसिद्ध व्हावे असे वाटत असते. श्री. गोखले हेही याला अपवाद नव्हते. त्यासाठी त्यांची धडपड सुरूच होती. परंतु मध्यंतरीची आयुष्यातील आठ - नऊ वर्षे व्यक्तिगत संघर्षात जरी गेली तरी त्यांचे लिखाण चालूच राहिले. १९७८ ते १९८६ पर्यंत 'स्वराज्य' साप्ताहिकात त्यांच्या चौदा कथा प्रसिद्ध झाल्या.

कळसगावी राहत असताना पहिले काही महिने तिथे वीज नव्हती. चवथ्या मजल्यावर झोपयावर पत्रा होता. नळाला पाणी रात्री दोन वाजता येत असे. अशा परिस्थितीशी संघर्ष करताना त्यांना नवनवीन कथांचे बीज सापडले. नवकथाकारांना येणारा 'साहित्य साभार परत' हा अनुभवही गोखल्यांना आला. परंतु निराश, नाउमेद न होता त्यांनी आपले लिखाण चालूच ठेवले. 'किर्लोस्कर', 'मेनका' मासिकांतही त्यांच्या 'ढाल', 'केवडा' या कथा प्रसिद्ध झाल्या. दैनिक केसरीमधूनही त्यांनी खूप लिहिले. १९९१ मध्ये साहित्य संस्कृती महामंडळाच्या अनुदान योजनेद्वारा 'ढाल' हा त्यांचा पहिला कथासंग्रह नागपूरच्या ज्ञानेश प्रकाशनाने छापला. 'विपुलश्री' मासिकातही त्यांच्या काही कथा प्रसिद्ध झाल्या. एवढं लिखाण केले तरी त्यांच्या कथेला दिवाळी अंकातून कधीच स्थान मिळाले नाही याची खंत ते प्रांजळपणे कबुल करतात. 'संवाद'च्या संपादक मंडळातही त्यांनी काही काळ काम केले.

लेखनाच्या ध्यासापोटी त्यांनी बँकेतील नोकरी सोडली. यानंतर त्यांचे लिखाण अव्याहत चालू आहे. आजपर्यंत त्यांचे १) ढाल, २) बंडाचा अदृश्य झेंडा, ३) अरे संसार संसार, ४) तिची गोष्टच वेगळी हे चार कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्याचप्रमाणे १) यादे रसभरी, २) मूव्ही मेकर्स, ३) हमसफर, ४) अभिनेत्री, ५) स्वरगंगेच्या काठावरती, ६) शमा परवाना ही चित्रपटविषयक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

'बंडाचा अदृश्य झेंडा' या कथासंग्रहाचे प्रकाशन करताना 'मृत्युंजय'कार श्री. शिवाजीराव सावंत 'श्री. गोखले यांच्या लेखनात मला साहित्यसम्राट न. चि. केळकर यांच्या उपरोधिक कथनशैलीचा भास झाला.' असे गौरवोद्‌गार काढले.

आपल्या लेखनाच्या व्यासंगाबरोबर आता ते सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करतात. तबला, पेटीची साथ न घेता हिंदी, मराठी गाणी आणि त्याचबरोबर काही किस्से असा त्यांचा एक तासाचा एकपात्री कार्यक्रम असतो. त्यांना मधुर आवाजाची ईश्वरी देणगी आहे. तालाचे विशेष ज्ञान नसले तरी स्वर त्यांना वश आहेत. श्री. गोखले यांच्या यापुढील लेखन व सांस्कृतिक कार्यप्रवासास असोसिएशन व संवादतर्फे शुभेच्छा!

श्री. गोखले संपर्काकरिता - फो. ९९२२९१३३१५

- श्री. प्रभाकर गुपचूप, पुणे फो. ९८८१५७१४९९

# आमची देशसेवा -
# बचत गट का बचाव गट?

बाजारात जरी प्रचंड महागाई आणि जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा असला तरी सत्कार - समारंभ - मान - सन्मान व पुरस्कार यांचे पीक हायब्रीड वांग्याप्रमाणे अमाप आलेले आहे. घराच्या बाहेर पडल्यावर जो भेटतो तो पुरस्कारांनी सन्मानीत झालेला भेटतो. त्या मानाने आमच्या कॉलेजच्या पदव्या आणि ऑफिसमधील बढत्या कवडी किमतीच्या. जे दारी तेच घरी. आमच्या सौ.ला महिला बचत गटात सहभागी होण्याचे डोहाळे लागले आणि पाहता पाहता अध्यक्षपद मिळाले. यामुळे ती हल्ली राष्ट्रपती झाल्यासारखे झेयावर पदर घेऊनच हिंडते. सगळ्यात कहर म्हणजे त्यांना महिला बचतगटाचे अध्यक्षपद मिळाल्याबद्दल आमचे वाडीतील अखिल विश्व बालगणेश मंडळाने विसर्जनाचे आदल्या दिवशी त्यांच्या विविध गुणदर्शनात अध्यक्षपद देऊन सत्कार करण्याचे ठरविले. प्रत्येक जाहीर भाषणांमध्ये यशस्वी पुरुषामागे सावलीप्रमाणे एक स्त्री खंबीरपणे सातत्याने उभी असते व तिच्याच कर्तव्यदक्षतेमुळे व संसारामधील काटकसरीमुळे - व्यवहारदक्षतेमुळे पुरुषाला समाजात लष्कराच्या भाकरी भाजण्यास सवड मिळते अशी पुस्ती पण जोडलेली असते. येथे तेच झाले. त्यांचे निमंत्रणाबरोबर मी पण या कार्यक्रमास उपस्थित राहून अध्यक्षबाईंची ओळख व त्यांच्या कार्यकुशलतेबद्दल दोन शब्द बोलावेत अशी विनंती झाली. इतर ठिकाणी सत्कार झाल्यानंतर पुरुषाबरोबर बायकोस पण व्यासपीठावर आमंत्रित करून साडी - चोळी - श्रीफळ - फुलांचा गुच्छ - पेढ्याचा पुडा मिळत असतो. यामुळे सौ.ंचा सत्कार झाल्यावर मला पण धोतरजोडी नाही तर निदान शर्टचे कापड, पँट पीस वगैरे वस्तू भेट म्हणून मिळतील असे वाटले. कारण गेले पंधरा - वीस वर्षे सेवानिवृत्त झाल्यावर मी सर्व कपडे अल्टर करूनच वापरत आहे. तेव्हा आमंत्रणाचा आदर फारसे आढेवेढे न घेता केला. परंतु कार्यक्रमात माझ्याच बायकोबद्दल - उघडपणे दोन शब्द चांगले बोलणे म्हणजे आपणहून तोफेच्या तोंडी उभे राहण्यासारखे होते. उत्सवमूर्तीबद्दल बोलण्यासाठी मी महत्त्वाचे मुद्दे शोधण्यास सुरुवात केली आणि विषयाची फोड करताना कांदा चिरताना जसे डोळ्यात पाणी येते तसे माझे डोळे पाणावले. महिला आणि बचत किती प्रेमळ शब्द आणि सत्कार कोणाचा आमच्या गृहदेवतेचा - मी मनातल्या मनात - महाकाली - महालक्ष्मी - महासरस्वती - जगदंबेचा - जय हो असा मंत्र दहा वेळा केला. अष्टभूजेच्या हातात सोळा आयुधे असतात, येथे आमचे निवासी - हातामध्ये बँकेचे पासबुक - ए. टी. एम. कार्ड - क्रेडिट कार्ड - सेल्सच्या जाहिराती - शॉपिंग मॉलचे पत्ते - मोबाईल आणि आजूबाजूला मैत्रिणी यामुळे मी बापुडा काय बोलणार? पेन्शनवाढीची वाट बघणारा मी एकटा आणि दहा हाताने खर्च करणारी धर्मपत्नी - हा मुद्दा वाढत चालला म्हणून माझे भाषणातील हा भागच गाळला आणि ओळख - परिचय - मनोगत - कार्य - कर्तृत्व - नेतृत्व - दातृत्व - समाजसेवा - त्याग - निष्ठा असे भारदस्त शब्द गुंफण्यास सुरुवात केली.

''उपस्थित बंधू आणि भगिनींनो, - काही महिलांकडे बघून भगिनी हा शब्द उच्चारल्यावर मंडळातील टारगट मुलांनी उगाचच टाळ्या पिटल्याचा भास झाला. मी बचत गटाची व्याख्या - व्याप्ती - उपयुक्तता - विस्तार - लाभार्थी - आर्थिक उलाढाल - अर्धपोटी जनता - सरकार - सावकार - दलाल - सेवा - त्याग - ज्ञानदान - भ्रष्टाचार - संप - मेळावा - नेता - निदर्शने - बंद - सत्याग्रह - अशा जाडजूड शब्दांची उधळण करून बचत गटाची क्षमता - आवश्यकता - कार्यप्रणाली - कार्यक्षेत्र - कार्यकर्ते असे बडबडणे चालू ठेवले तेव्हा एका प्रेक्षकाने वहिनींबद्दल बोला - वहिनींबद्दल बोला असा आरडाओरडा केला. त्यांनी सत्य सोडून असत्याबद्दल बोलण्याचा आग्रह का केला हे उलगडले नाही. मी भाषणास परत सुरुवात केली. बंधू आणि भगिनींनो - 'ज्याचे हाती पाळण्याची दोरी, ती जगा उद्धारी' हे वाक्य बायकोकडे बघून म्हणालो आणि टाळ्यांचा कडकडाट झाला. खरं म्हणजे आमची बायको फार उधळी आहे, काटकसर हा शब्द माहित नाही, आता शेवटच्या श्वासापर्यंत पेन्शन वाढणार नाही आणि औषधाला पैसे पुरणार नाहीत. परंतु हे बोलण्यास माझे धाडस झाले नाही. मी सेवानिवृत्त झाल्यानंतर गृहदेवतेने भांडेवाली - धुणेवाली - वरकामाची मुलगी - स्वयंपाक करणारी आजी यांना कामावरून सुट्टी दिली होती कारण मी चोवीस तास मोकळा होतो. यामध्ये महिना हजार रुपयांची बचत होती. वरची कामे म्हणजे दूध आणणे - पेपर आणणे - गाद्या घालणे - गाद्या काढणे - केरकचरा - देवपूजा माझे माथी. यातच होतो म्हणे मला थोडासा व्यायाम. बाकी सर्व बाजारहाट त्या करतात - कारण मी भाजीकडे बघून भाजी आणण्यापेक्षा भाजीवालीकडे बघून भाजी आणतो हा गैरसमज. आता काकडी किंवा दोडका घरी आणल्यावर कडू निघाला तर मी काय करणार? नवीन साडी घेण्यासाठी तर त्यांना काही कारणाच लागत नाही. निमंत्रणापैकी लग्न - मुंज - बारसे - वास्तूशांत - डोहाळेजेवण - साठीशांती - सहस्त्रचंद्रदर्शन - मंगळागौर - अगदी बारावा तेरावा या आमंत्रणाचा स्वीकार - जेवणापरी जेवण बाहेर पडते आणि रिटर्न गिफ्ट का काय म्हणतात ते घेऊन येते. ती तर अडगळीची बचत निराळीच. माझे भाषणानंतर सौं.चा सत्कार झाला. कौतुकाचा वर्षाव - हार - गुच्छ - श्रीफळ आणि साडी. मी फक्त हाताची घडी घालून आज्ञाधारक बालकाप्रमाणे व्यासपीठावर बसून होतो. इतक्या गर्दीत आणि गडबडीत बायकोने साडीची घडी थोडीशी उघडून साडीचा रंग - पोत - पदर - काठ बरोबर नाही - सोबत ब्लाऊजपीस नाही - तेव्हा गणेश मंडळाचे सेक्रेटरींकडून साडी बदलून तरी घ्या किंवा खरेदीची पावती घ्या

म्हणून माझे कानात सांगितले. तेवढ्यात भारनियमनामुळे लाईट गेले आणि कार्यक्रम संपला. पुरस्कार - पुरस्कार - मला दिखाऊपणाचा अगदी तिरस्कार आला. साडी परत करण्याचे अटीमुळे मला रात्रभर झोप लागली नाही आणि मिसेस साडीची घडी उशाला घेऊन घोरत होत्या. मी केलेला बेड टी घेतल्यावर त्यांनी सकाळचे कोवळ्या उन्हात त्या साडीचा रंग बघितला आणि नंतर कडक उन्हात न जाता सायंकाळी ऊन उतरल्यावर आम्ही साडी परत करण्यास दुकानात गेलो. मला मात्र खूप खूप लाजल्यासारखे होत होते. परंतु स्वामिनी अगदी महिला आरक्षणाचा हक्क बजावत होती. साडी आणि एक हजार रुपयांची पावती दुकानदाराकडे देऊन त्यांनी दुसरी चांगली साडी द्या किंवा एक हजार एक रुपये परत करा म्हणून दुकानदारास दमात सांगितले. दुकानदारही त्याच वंशाचा. तो प्रथम मोठ्याने हसला आणि म्हणाला - अहो ताई - ज्या गावच्या बोरी त्याच गावाच्या बाभळी. सेलमधला टाकाऊ माल - त्याचे फक्त शंभर रुपये परत मिळतील. उरलेले नऊशे रुपये तुमचे गणेश मंडळाच्या सेक्रेटरीकडून घ्या. फुकट कोण करतो देशसेवा? गल्लीपासून दिल्लीपर्यंत आपण सर्वजण एकाच माळेचे मणी आहोत. तुमचा सत्कार केला हे पुढारीपण आणि समाजसेवा व मी टाकाऊ माल चढत्या भावाने विकला हा माझा व्यापार झाला. दळण - वळण, देवाण - घेवाण याला समाजातील सामान्य माणूस भ्रष्टाचार का म्हणतो समजत नाही. तुम्ही मत हे फक्त द्यावयाचे असते. व्यक्त करावयाचे नसते. मी कुठेतरी वाचले आहे बघा, Government of the people, by the people आणि for the people. आम्ही तुमच्यासारखे जास्त शिकलो नाही पण पहिल्यापासून देशसेवा म्हणजे देशसेवा - व्यापारी बोलत होता.

आम्ही मुकाट्याने शंभर रुपये परत घेतले आणि घरी आलो. सोसायटीत गणपतीची आरती चालली होती - घालीन लोटांगण वंदिन चरण, डोळ्याने पाहीन रूप तुझे.

- मधुकर दिगंबर पालकर, पुणे - ३०.

०२० - २४४७१७६६

## विनोद -

### ढापलीच त्याने.....

दिवाळीत गावी जाण्यासाठी पोस्टमन बाळूने आठ दिवस रजा घेतली. गावी पोहोचताच त्याला एकदम आठवलं की आपली दिवाळीची पोस्त तो बदली पोस्टमन ढापणार. त्याने लगोलग गावातल्या पोस्टातून कार्ड विकत आणली. पोस्त न मागताच आपल्याला उदारपणे पोस्त देणाऱ्यांची यादी केली आणि त्या सर्वांना बाळूने पत्र पाठवली. पत्रात म्हटलं होतं - ''दिवाळीच्यासाठी मी आठ-नऊ दिवसाकरिता माझ्या गावी जात आहे. रजा संपल्यावर नेहमीप्रमाणे आपल्या सेवेत हजर होणार आहे. तरी सालाबादप्रमाणे मजवर लोभ ठेवालच अशी नम्र आशा आहे. - आ.बाळू पोस्टमन.''

बाळू रजेवरून परत आला तेव्हा त्याच्या बदली टपाल वाटणाऱ्या एका पोस्टमनने इतर बटवड्याच्या पत्रांबरोबर आणखी एक गठ्ठा बाळूच्या हातात कोंबला. ती सगळी पत्रं बाळूने स्वत: लिहिलेली होती.

******

### उरलेलेही असेच फिटतील

बऱ्याच दिवसांनंतर आज शाम्याची रस्त्यात गाठ पडली. अन् मला आठवण झाली की त्याला ६० रू. उसने दिले होते. ''अरे असतोस कुठे हल्ली ? वर्षभरात दिसला पण नाहीस.'' मी विचारले.

''सध्यातरी इथंच आहे. जाणार कुठे ? बरं तुझं कसं आहे?'' शाम म्हणाला.

''मस्त ! झक्कास !! ते असू दे मला सांग वर्षभरापूर्वी मी तुला ६०० रू. दिले होते... '' मी त्याला आठवण दिली - ''ते अद्यापि तू परत केले नाहीस.''

''अच्छा ! जरा सांभाळून घे रे बाबा ! सध्या फार कडकी चालू आहे. कायमची नोकरी-धंदा नाही. तुझं छान आहे नं ? आनंद आहे.'' शाम दीनपणे म्हणाला - मलाही त्याची कीव आली म्हटलं, ''शाम ६०० रू. राहू दे तू तीनशे परत कर. तीनशे रूपये फिटले असं मी समजतो. दे तीनशे दे !

देईन रे बाबा ! कुठे पळून चाललोय मी. आणखी थोडी कळ काढ ! सध्या तीनशे रूपये तरी फिटलेत ना ?'' निर्लज्जपणे शाम्या म्हणाला.

- मधु रानडे, नाशिक

नाट्यछटा

## मंत्री

राम राम मंडळी. मी गुंडूराव धोंडूराव पाटील. पुरोगामी महाराष्ट्राचा सध्याचा अनर्थमंत्री! सॉरी, अर्थमंत्री. हे विरोधी पक्षवाले मला नेहमी अनर्थमंत्री म्हणतात म्हणून तोच शब्द तोंडातून बाहेर पडला असो. गेल्या २० वर्षापासून मंत्र्याच्या खुर्चीला चिकटून हाये. याशिवाय गावाकडे आमच्या एक साखर कारखाना, एक सहकारी सूत गिरणी, २ कॉलेज, २ हायस्कूल. लई मोठा बारदाना हाये! मुख्यमंत्र्याच्या खुर्चीवर डोळा ठेवून राजकारण सुरू हाये!

तसे आम्ही मुळचे दरोडे पाटील. आमच्या आता विंग्रजांच्या काळात दरोडे घालायचा. आमच्या बापानंपण तोच वारसा चालवला. एकदा इंग्रज सरकारचा खजिना लुटला. दोन विंग्रज शिपाई मारले. पण पठ्ठ्या सापडला नाही. भूमिगत झाला व शेवटपर्यंत गावला नाही. शेवटपर्यंत म्हणजे इंग्रज असेपर्यंत. मग स्वातंत्र्य मिळाले, इंग्रज पळाले. मग बाप राजकारणात घुसला. स्वातंत्र्यसैनिक म्हणून पुढे झाला. न्हेरूंच्या हस्ते गौरव करून घेतला. अन् आमदार म्हणून निवडून आला. तो गेला मग आमदारकी आपसूकच माझ्याकडे चालत आली. मंग मी मंत्री झालो.

राजकारण म्हणजे लई कटकट असती राव, कोन कवा टांग मारल लक्षात बी येत नाही.

मोबाईल वाजतो, हॅलो कोन? प्रमिला, बोल बोल मोबाईल वर हाथ ठेवून, प्रमिला म्हणजे बायकोची बहीण हो म्हणजे साली आपली. अहो एम.ए. थर्डक्लास हाये! पण मी तिला माझ्या कॉलेजची प्रिन्सिपॉल केली हाय ! काही बाही लिवत असते. छापून बी आणते. आता शिणेमाची स्टोरी लिवली हाये! एक मराठी शिणेमा काढते आहे! अहो पैसा पोत्यानं पडला आहे. मग म्हटलं शिणेमा काढावा!

हा बोल, कोण डायरेक्टर कुलकर्णीला बोलायचं आहे. हं दे त्याला. काय म्हणतो. हां नमस्कार! हा हा कुठंपर्यंत आल शूटींगचं काम होत आलं, एक फक्कड लावणी टाका त्यात ती हाय ना आपली 'मला जावू द्या ना घरी आता वाजले की १२ सारखी! काय शिणेमा कौटुंबिक ट्रॅजिडी हाय! मग काय झालं! नायक शाळामास्तर आहे! मग शाळा मास्तरनी काय लावणी ऐकू नये की काय? माझं ऐका ! तो पिंजऱ्यातला मास्तर नव्हता का तमाशात गेलथा! तसं काहीतरी दावा कि हो. नको अहो दु:खामुळे मास्तर तमाशा बगायला जातो असं दावा, पण लावणी फक्कड झाली पायजे! नायतर तुमचे १३ वाजतील, ठेवा आता महत्त्वाची मिटींग चालू आहे. मोबाईल खिशात ठेवतो.

अरे गण्या कुठे आहेस तू, कालची आपली ज्वारीची बाटली आण जरा दोन पेग मारतो! काय संपली! मग बाजरीची आण! शाबास थोडा बर्फ घेवून ये. बरं कोणाला आत सोडू नको. मी कामात हाये म्हणावं!

**- वसंत धुपकर,** पुणे, ☎: २५३१४४७२

## प्रतिक्रिया

ऑक्टोबर महिन्याच्या 'संवाद' मधील आ.ता.पुरेकर अर्थात श्री.वसंत धुपकर यांचा लेख वाचला. सद्य परिस्थितीवर उपरोधात्मक भाष्य करणारा हा लेख फारच आवडला.

धुपकरांना विनोदाची उत्तम जाण आहे. एक मात्र खरं की 'सोनं किती महाग' असं म्हणून प्रत्येक जण सोनं खरेदी करत असतो. असो. धुपकर, तुम्ही लिहीत राहा. 'पुरे कर' असं कोणीही म्हणणार नाही.

**- नंदकुमार विजयकर,** मुंबई

****

'संवाद'चा दिवाळी अंक मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंत सर्वच वाचनीच व मननीय आहे. विनोदी लेख, कविता इतर लेख विनोद सर्वच मनाला सुखावून जातात. प्रभाकर गुपचूप यांची 'झाले मोकळे आकाश' ही लघुकथा आपल्याला एका वेगळ्याच भावविश्वात घेऊन जाते. जामातो दशम ग्रह: हा श्री.धुपकरांचा विनोदी लेख मनाला सुखावून जातो.

श्री. क्रांतिसेन आठवले यांनी ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानावरील लिहिलेला लेख सर्वोत्कृष्ट आहे. लेखकाने पसायदानावरील अनेक मान्यवरांची मते देऊन माऊलींनी पसायदानातील प्रत्येक शब्द का व कशासाठी लिहिला ह्याचे अर्थपूर्ण विवेचन मार्मिक शब्दांत सोप्या भाषेत सांगितले आहे. पसायदान अनेकांचे पाठ असते. परंतु श्री. आठवले यांनी पसायदानाची विश्वव्यापक कथा समजावून देऊन वाचकांना ज्ञानेश्वर माऊलींची व्यापक दृष्टी समजावून दिली आहे. श्री. आठवले यांचे अभिनंदन!

या अंकातील सर्व लेखकांचे, कवींचे मनापासून आभार.

**- र.भा. देशमुख,** पुणे, ☎ २४५३८४२६.

### माझी फी विसराल

''काय होतयं तुम्हाला ?'' डॉक्टरांनी पेशंटला विचारलं, ''हल्ली-हल्ली सारखं विसरायला होतयं !'' पेशंट म्हणाला.

''अच्छा.... तुम्ही असं करा.. माझ्या फी चे पैसे काऊंटरवर जमा करून पावती घेऊन या... उद्यापासून तुमच्या विसरभोळेपणावर उपचार सुरू करीन म्हणतो'' डॉक्टर म्हणाले.

- मधु रानडे, नाशिक

## समर्पिता निवेदिता (स्मृतिशताब्दी वर्ष)

मागरिट नोबल अर्थात् भगिनी निवेदिता यांचा जन्म २४ ऑक्टोबर १८६७ मध्ये उत्तर आयर्लंडमध्ये अलस्टर शहरी झाला. त्यांचे वडील श्री सॅम्युअल नोबल हे धर्मोपदेशकाचे काम करीत. आई मेरी नोबल या सुस्वरूप व सौजन्यशील व्यक्ती होत्या. मागरिट हे या दांपत्याचे ज्येष्ठ दांपत्य. बाळंतपणातून सुखरूप सुटका व्हावी, म्हणून आई मेरी नोबल देवाची करूणा भाकत होत्या. ''होणारे बालक मी तुझ्या चरणी अर्पण करीन'' आणि म्हणून ह्या बालिकेचे नाव मागरिट' ईश्वरीय कार्यात समर्पित झालेली असे ठेवले.

मागरिट यांचे शालेय शिक्षण इंग्लंडमध्ये मँचेस्टर येथे झाले. बुद्धीने प्रखर स्वभावाने प्रेमळ, चौकस स्वभाव प्रत्येक गोष्ट तर्कावर घासून पाहणे आणि देशप्रेमाचे बाळकडू त्यांना त्यांच्या आजोबा व जनसेवेचे बाळकडू वडिलांकडून मिळाले. किंबहुना तो त्यांच्या आयरिश रक्ताचाच गुण होता. मागरिट यांचे शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच त्यांचे पितृछत्र हरपले. साहजिकच त्या कुटुंबाला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. लहान भावंडांना वाढवावे लागले. त्यांनी आपले शिक्षण पूर्ण झाल्याबरोबर शिक्षिकेची नोकरी स्वीकारली. ही नोकरी केवळ पोटाचा व्यवसाय म्हणून त्यांनी स्वीकारलेली नव्हती तर त्यांना या क्षेत्रात अभ्यास करून वेगवेगळे शैक्षणिक प्रयोग करून नवीन शिक्षण पद्धती शोधण्याचे त्यांचे प्रयत्न होते. म्हणून १८९२ मध्ये स्वत:च एक विद्यालय सुरू केले.

एक शिक्षणतज्ञ म्हणून नावारुपाला येत असताना अनेक विद्वान व्यासंगी स्त्री पुरूषांबरोबर संपर्क होऊन काही क्लबचे सभासदत्व पत्करले. अशाच एका कार्यक्रमात हिंदुस्थानातून आलेल्या तरूण संन्याशाचे म्हणजेच स्वामी विवेकानंदांचे विचार ऐकण्याची संधी त्यांना मिळाली. त्यांच्या विचारांचा पगडा मागरिट यांच्या मनावर पडू लागला. सारखे सारखे स्वामींचे भाषण ऐकण्यासाठी त्या प्रयत्न करू लागल्या. आपल्या शंकांचे समाधान त्या स्वामींकडून करून घेऊ लागल्या. त्यांच्या मनातील ख्रिश्चन संस्कार, गौतम बुद्धाचे विचार, स्वामी विवेकानंदांनी सांगितलेले वेदांत विचार व यातून सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न, या सर्व मनाच्या अवस्थेमध्ये स्वामींकडून मनाला शांती मिळू लागली व हळूहळू त्या स्वामी व हिंदुस्थानचा तेथील जनतेचा विचार करू लागल्या. एका व्याख्यानात स्वामी विवेकानंदांनी सर्वांना आवाहन केले. ''आज जगाला गदगदा हलविण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी मला वीस स्त्री-पुरूष हवे आहेत ज्यांचा परमेश्वरावर विश्वास आहे. परमेश्वर प्राप्तीचा ध्यास लागल्यावर भीतीचे कारण काय? हा ध्यास जर खरा असेल तर बाकीच्या गोष्टींची किंमत काय? आणि तो खरा नसेल तर मग आपल्या जगण्याचे तरी प्रयोजन काय?''

मागरिट यांच्यावर या आवाहनाचा खूपच खोलवर परिणाम झाला व मधील ३-४ वर्षे त्यावर विचार करून, स्वामींशी पत्रव्यवहार करून आपल्या आई व इतर नातेवाईकांचे बरोबर चर्चा करून, स्वामी विवेकानंदांनी पत्रातून हिंदुस्थानातील लोकांची परिस्थिति, देशातील भौगोलिक, सामाजिक, राजकीय परिस्थिति कळवून 'आपण आपल्याच देशात राहून हिंदुस्थानसाठी काम करावे' असे सुचवूनही मागरिट यांनी इकडील लोकांची सेवा करण्यासाठी आपला प्रगत देश सोडला व २८ जाने. १८९८ ला भारताच्या भूमीवर पाय ठेवला. मागरिट यांनी जाणून बुजून हे व्रत स्वीकारले.

स्वामी विवेकानंद स्वत: त्यांच्या स्वागताला हजर होते. त्यांना रामकृष्णमठ दाखविला गेला. सर्वांशी परिचय करून दिला गेला. निवासाची व्यवस्था केली गेली. बंगाली शिकविण्याची व्यवस्था केली. ब्रह्मचारिणी वृत्तीची दीक्षा दिली व अध्ययन सुरू झाले. मागरिट यांचे भारतातील वास्तव्य, मंदिर प्रवेश वगैरे गोष्टी काहींना रूचल्या नाहीत. पण स्वामी विवेकानंदांनी ही परिस्थिती अतिशय कौशल्यपूर्ण हाताळली. कोणालाही न दुखविता आपलेसे केले. त्यामुळे मागरिट, आत्ता त्यांचे नाव भगिनी निवेदिता असे झाले, यांचे सर्वत्र स्वागत होऊ लागले. आपला स्वत:चा देश सोडून आपली सेवा करण्याकरिता इतक्या लांब आल्यामुळे त्यांच्याबद्दल आदराची भावना लोकांच्यामध्ये निर्माण झाली. रामकृष्ण मठातील सर्व संन्यासी त्यांना मदत करण्यास मनापासून तयार असत. स्वामी विवेकानंद निवेदितांना वेळोवेळी चर्चेमधून हिंदुस्थानचा इतिहास दंतकथा, चालीरिती येथील जीवन पद्धती, जाती पद्धती वगैरे माहिती अतिशय सुस्पष्ट काव्यपूर्ण भाषेत आणि रसाळ वाणीने सांगत की इतर सर्व पुराणांपेक्षा अतिरम्य असे हे एक भारत पुराणच आपण ऐकत आहोत, असे निवेदितांना वाटे.

भगिनी निवेदितांना स्वामींचे हे नवे रूप अतिशय लोभस वाटले. पाश्चिमात्त्य शिष्यांच्या शिक्षणासाठी स्वामी खूपच परिश्रम घेत आहेत. स्वामींना हा त्यांचा प्रयोग अयशस्वी होऊ द्यायचा नव्हता. कोणत्याही परिस्थितीमुळे निवेदितांनी स्वीकारलेली जबाबदारी अर्धवट सोडून परत मायदेशी जाऊ नये, असेच त्यांचे सदैव प्रयत्न, वागणूक, शिकवण होती. भगिनी निवेदिता पण सकारात्मक प्रतिसाद देत असत. त्यांनी स्वामींच्या इच्छेप्रमाणे मुलींसाठी शाळा काढण्याची तयारी सुरू केली आणि १२ नोव्हें. १८९८ ला शाळा सुरू केली. १४ मुलींनी आपली नावे शाळेत घातली. 'बालिका विद्यालय' या नावाने ही शाळा कलकत्त्यात सुरू झाली. अशक्य घटना सत्यात उतरविली गेली. अनेक अडचणींवर मात करून हे शक्य झाले.

फेब्रुवारी १८९९ च्या सुमारास कलकत्त्यामध्ये प्लेगची साथ

सुरू झाली. रामकृष्ण मठातर्फे एक समिती स्थापन करण्यात आली. निवेदिता सेक्रेटरी तर पर्यवेक्षक म्हणून स्वामी सदानंदांची नेमणूक झाली. इतर स्वामी मदतीला होते. गलिच्छ वस्त्या स्वच्छ करणे, आजारींची सेवा करणे, प्लेग व विद्यार्थ्यांचे कर्तव्य या विषयावर निवेदितांनी व्याख्यान दिले. सेवा कार्यासाठी पैसे गोळा केले गेले. रोग्यांना दूध, फळे दिली जात. स्वत: दूध न घेता निवेदिता पैसे वाचवून ते या कार्यासाठी देत. गरीब वस्त्यांमध्ये जाऊन निवेदिता रोग्यांची सेवा करत. त्यांनी आपल्या स्वत:ला या कार्यात झोकून दिले होते. मठाजवळील बरेच पैसे यासाठी खर्च झाले. दैनंदिन व्यवस्थेसाठी अडचण भासू लागली. स्वामी विवेकानंदांनी प्रकृती सुधारण्यासाठी परदेशी जावे व भगिनी निवेदितांनी परदेशात व्याख्याने देऊन पैसे उभे करावे असे ठरले.

२० जून १८९९ ला स्वामी, निवेदिता व स्वामी तुरियानंद यांनी पश्चिमेकडे प्रस्थान केले. स्वामी विवेकानंद ऑगस्ट १८९९ ला लंडनहून अमेरिकेत गेले. भगिनी निवेदिता लंडनमध्ये आपल्या आईकडेच राहत होत्या. या काळात त्यांनी अमेरिका, पॅरिस येथे जाऊन व्याख्याने दिली व जमलेले पैसे आपल्या भारतातल्या कार्यासाठी घेऊन त्या भारतात परतल्या तेव्हा स्वामी विवेकानंद यांची प्रकृती पुन्हा ढासळली. ४ जुलै १९०२ ला स्वामी विवेकानंदांनी महासमाधी घेतली.

स्वामींच्या मृत्युचे दु:ख ताजे असतानाच निवेदिता मठापासून दूर झाल्या. कारण त्यांनी आता हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करणाऱ्या जहाल युवकांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी घेतली होती. स्वामींचा संदेश हिंदुस्थानभर सांगण्यासाठी त्यांनी दौरे सुरू केले. व्याख्याने, वृत्तपत्रांतून लिखाण चालूच होते. योगी अरविंद त्यावेळेस बडोद्याला प्राध्यापक होते. बडोद्याचे सयाजीराव महाराज यांची गाठ घेतली व स्वातंत्र्य संग्रामात आपणही भाग घ्यावा अशी विनंती निवेदितांनी महाराजांना केली.

कलकत्त्यातील प्रतिष्ठित लेखक, कवी, संपादक तरुण क्रांतीकारक यांच्या कुटुंबाबरोबर निवेदितांच्या गाठीभेटी चर्चा सुरू झाल्या. यामध्ये प्रामुख्याने श्री.रविंदनाथ ठाकूर, चित्रकार अवनिंद्रनाथ, पदार्थ विज्ञानाचे प्राध्यापक, डॉ.जगदीशचंद्र बसू, सौ. अबला बसू यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. डॉ.जगदीश चंद्रांनी ''प्रत्येक जडसुद्धा चैतन्यमय आहे. धातूमध्येही प्राण आहे हे प्रयोगांनी सिद्ध केले होते.'' त्या संशोधनावर त्यांनी काढलेल्या टिपणावरून निवेदितांनी 'Plant Response' ह्या विख्यात पुस्तकाचे हस्तलिखित तयार केले. एवढेच नव्हे तर डॉ. बोस यांनी 'बसू विज्ञान मंदिर' ही संस्था काढावी म्हणून त्यांनी खूपच परिश्रम घेतले.

१९०३ मध्ये भगिनी निवेदितांचा नामदार गोपाळकृष्ण गोखले यांचेबरोबर परिचय झाला. श्री.गोखले मवाळांचे नेते असूनही जहाल प्रतांच्या निवेदितांबरोबर अकृत्रिम स्नेह उत्पन्न झाला. त्यांनी कॉंग्रेसमध्ये यावे अशी श्री.गोखले यांची इच्छा होती. त्या दोघांमध्ये हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्नांवर पद्धतीवर चर्चा होत. पण एकमेकांचा आदर ठेवून.

याच सुमारास भगिनी निवेदितांनी त्यांचा 'भारतीय जीवनातील सूत्र' हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. निवेदितांच्या अनेक व्याख्यानांचे विषय हे भारताच्या सद्य परिस्थितीशी निगडीत असे होते. 'स्त्रियांचे शिक्षण', 'भारतीय स्त्रियांचे प्रश्न', 'कालीमाता', 'आशियातील इस्लाम', 'यंग इंडिया मूव्हमेंट'

श्री. रामानंद चटर्जी 'प्रवासी' हे बंगाली नियतकालिक चालवत होते. निवेदितांशी त्यांचा परिचय झाला व तो वृद्धिंगत होत गेला. तेव्हा निवेदितांनी त्यांना इंग्रजी मासिक संपादित करण्याचा आग्रह केला. त्यात लेख देण्याची हमी दिली. म्हणून १९०७ मध्ये श्री.चटर्जी यांनी'मॉडर्न रिव्हू' हे मासिक सुरू केले.

लॉर्ड कर्झन आपणा भारतीयांना कुपरिचित आहेच. त्यांनाही नामोहरम करण्याचे धारिष्टय व बुद्धिमत्ता, अभ्यास व भारताबद्दल असीम प्रेम हे भगिनी निवेदितांचे वैशिष्ट्य होते. सतीशचंद्र मुख्योपाध्याय यांनी स्थापन केलेली 'डॉन सोसायटी' हे निवेदितांचे आणखी एक कार्यक्षेत्र होते. १८९७ साली 'डॉन उष:काल' व बिपिनचंद्र पाल यांचे 'न्यू इंडिया' बारींद्रकुमार यांचे 'युगांतर' अरविंदाचे 'वंदेमातरम्' अशा अनेक वृत्तपत्रातून निवेदिता लिहित असत. याच सुमारास निवेदितांच्या मनात भारताच्या राष्ट्रध्वजाची कल्पना येऊ लागली. भगव्या वस्त्रावर पिवळे वज्र काढलेला 'वंदे मातरम् यतो धर्मस्ततो जय:।' असे शब्द लिहिलेला लांबट चौकोनी ध्वज त्यांनी बनविला.

१९०१ च्या सुमारास स्वदेशी आंदोलनाने चांगलाच जोर धरला होता. निवेदिता स्वदेशी वस्तू हात गाडीवर ठेवून स्वत: रस्त्यावरून विक्री करत असत.

स्वामी विवेकानंदांचे धाकटे बंधू श्री.भूपेंद्रनाथ हे क्रांतीकारक हाते ते 'युगांतर' ही पत्रिका चालवत होते. त्या पत्रिकेत जहाल लेख छापल्याबद्दल त्यांचेवर राजद्रोहाचा खटला भरला व त्यांना अटक केली यामुळे निवेदिता अस्वस्थ झाल्या. त्या कोर्टात गेल्या, रू. २०,००० कोर्टात भरले व श्री भूपेंद्रना त्यांना जामिनावर सोडवून आणले.

असे बहुस्पर्शी व्यक्तिमत्त्व भारताच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये आपले सर्वस्व पणाला लावून व जेव्हा जेव्हा प्रसंग पडेल तेव्हा तेव्हा हिंदुस्थानातील जनतेची सेवा करीत, स्वत:च्या प्रकृतीची काळजी न घेता सर्वस्व झोकून देऊन सेवा करीत आणि हे करीत असतानाच दार्जिलिंग मध्ये १३.१०.१९११ ला त्यांनी देह ठेवला.

**- चिं. वि. असनीकर, पुणे**, भ्रमणध्वनी : ९४२३५८०३८४

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
Licence to post without Prepayment No.: LWP-217 at R.M.S., Pune Railway Station on 25th of each Month

## म्हातारपण



म्हातारपण, म्हातारपण म्हणजे काय हो असतं ?
तुमचं, आमचं सर्वांचंच सारखं असतं
गतकाळाच्या आठवणीत रंगून जायचं असतं
आगामी काळाच्या चिंतेत खंगून जायचं असतं
तरुणपण, गुंगारा देऊन टाटा, बाय बाय करत असतं
म्हातारपण, मिश्किलपणे हॅलो, हाय हाय करत असतं.
केस काळे करून वय आता लपवता येत नाही
मेकअप करून सुरकुत्याही झाकता येत नाहीत
व्यायाम, अध्यात्म, समाजसेवेत
लक्ष आता वळवावं लागतं
सवयीच्या गुलाम मनाला बळेबळे आवरावं लागतं
अढीमधल्या आंब्यासारखं जीवन पिकू लागतं
संध्याछायांच्या जाणीवेने शरीर थकू लागतं

**- अरुण भट,** बदलापूर (पूर्व) ठाणे
भ्रमणध्वनी - ९३२४५५८०५१

## थांग

एकदा ती म्हणाली, सगळ्यांवर कविता करता
माझ्यावर कध्धीसुद्धा, तुम्हाला कविता सुचली नाही
तिचा प्रश्न योग्य होता, घरात सौंदर्य असताना
मी बाहेरचे सौंदर्य, न्याहाळत होतो
तिच्या रुपावर मी, सुंदर कविता लिहिली
वाटले ती खुश होईल, पण चिडली
आणि तरातरा निघून गेली
काय चुकलं हेच कळेना
मग तिच्या हट्टीपणावर, कविता लिहिली
तर रडून गोंधळ
इतके दिवस हा विचार, डोक्यात नव्हता हेच योग्य होतं
स्त्रीमनाचा थांग कधी कुणाला लागला आहे का ?
जाता जाता एकच सांगतो
निसर्गाला, पशुपक्षांना
इतकेच काय राजकारण्यांवर
कविता करा,.. पण ...... ?

**- श्रीमती पद्मा देशपांडे,** ठाणे
दूरध्वनी - २५४०७२१७

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.